## ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणावर पंतप्रधानांचे जातीने लक्ष



**नवी दिल्ली :** ‘नीट’ यूजी पेपरफुटी प्रकरणावर शुक्रवारी (दि.२९) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी केंद्र सरकारने न्यायालयाला सांगितले की, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींशी संबंधित या प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः लक्ष ठेवून आहेत. केंद्र सरकारतर्फे बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी खंडपीठाला सांगितले, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींवर पंतप्रधान स्वतः देखरेख करत आहेत. यावरून सरकार हा मुद्दा अत्यंत गांभीर्याने हाताळत असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, पेपरफुटी किंवा प्रक्रियेमधील त्रुटी पुन्हा होऊ नयेत यासाठी केंद्र सरकार कठोर उपाययोजनांचा विचार करत आहे. पंतप्रधान कार्यालय थेट देखरेख करत असल्याने शिक्षण मंत्रालय प्रश्नपत्रिका वाहतूक आणि लॉजिस्टिक व्यवस्थापनासाठी संरक्षण दलांची मदत घेण्याच्या पर्यायाचाही विचार करत असल्याची माहिती समोर आली आहे.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३११
www.ramprahar.com
◆ शनिवार, ३० मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

अल्पवयीन मुलीला गरोदर करून लग्नास नकार/२
नेरळमध्ये भटक्या कुत्र्यांचा पुन्हा हल्ला; वृद्धाला चावा/५
‘आरडीसीए’च्या स्पर्धेत रोशन क्रिकेट अकॅडमी संघ विजेता/८

# पुण्यात विषारी दारूचे १३ बळी

**पुणे : प्रतिनिधी**

विषारी दारूमुळे पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात १३ जणांचा धक्कादायक मृत्यू झाला आहे. पिंपरी चिंचवडमधील दापोडी आणि फुगेवाडी भागात आठ जणांचा मृत्यू असून काळेपडळ येथील तीन, तर हडपसर भागात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी एकूण आठ जणांना अटक केली आहे.

उरुळी कांचन येथे ही विषारी दारू बेकायदेशीरपणे तयार करण्यात येत होती. दारूची नशा अधिक वाढण्यासाठी मुख्य आरोपी योगेश वानखेडे याने दारूमध्ये शरीरास घातक असलेले तब्बल २१५ लिटर मिथेनॉलयुक्त स्पिरीट मिसळले. त्यानंतर ही दारू पुणे आणि पिंपरी चिंचवड भागात विक्रीसाठी पाठवण्यात आली, जी प्यायल्यानंतर १३ जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

### मुख्य आरोपीसह आठ जण अटकेत





विषारी दारू प्रकरणात पोलिसांनी योगेश वानखेडे, कर्नलसिंग विरखा आणि इतर अशा आठ जणांना अटक केली आहे. योगेश वानखेडे हा सराईत दारू विक्रेता असून यापूर्वीदेखील त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. योगेशकडून पुरवठा करण्यात आलेली दारू पिंपरी चिंचवडमध्ये एका अड्ड्यावर कर्नलसिंग विरखा विकत होता. या विषारी दारू रॅकेटमागे अजून कुणी आरोपी आहे का याचा सखोल तपास सध्या सुरू आहे.

दरम्यान, विषारी दारूमुळे झालेल्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन पोलिसांनी दारूबंदीविरोधात मोठी मोहीम हाती घेत सलग दोन ठिकाणी धडक कारवाई केली. शिंदवणे व भवरापूर परिसरात सुरू असलेल्या गावठी हातभट्टी दारू अड्ड्यांवर छापे टाकून पोलिसांनी एकूण एक लाख १२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या. या कारवायांमुळे अवैध दारू व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून कठोर कारवाईचे आदेश

**मुंबई :** पुण्यातील विषारी दारूमुळे झालेल्या मृत्यूकांडाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेत दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. या संदर्भात मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या प्रकरणात आठ जणांना अटक करण्यात आली आहे. अजून काही जणांचा यात समावेश असू शकतो. त्यांचाही शोध घेण्याचे काम सुरू आहे. ज्या ठिकाणी हे झाले आहे, त्यांच्या पाठीमागे कोण त्यांनाही पोलीस शोधत आहेत. सगळी साखळी शोधून आणि त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, कारण ही एक प्रकारे हत्याच आहे.

# महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे; तर जगात एआयचे नेतृत्व करेल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास; मुंबई टेक वीकचे उद्घाटन



**मुंबई : प्रतिनिधी**

एआय क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी महाराष्ट्र अत्यंत सक्षम स्थितीत आहे. मुंबईची आर्थिक ताकद, तंत्रज्ञान कौशल्य, मजबूत स्टार्टअप परिसंस्था आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी यामुळे आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे; तर जगात एआयचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.२९) येथे व्यक्त केला.

मुंबईतील बीकेसी येथे ‘मुंबई टेक वीक २०२६’चे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी घेण्यात आलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी दिलखुलास उत्तरे दिली. या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई मनपा आयुक्त अश्विनी भिडे, महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आता प्रत्येक वर्षी अधिकाधिक संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्या महाराष्ट्राशी जोडल्या जात आहेत. सलग तीन वर्षे महाराष्ट्र हे गुंतवणूक व स्टार्टअप संख्येनुसार देशातील अग्रगण्य राज्य ठरले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## ‘मराठा आरक्षणाबाबत आढावा घेऊन अडचणी सोडवणार’



**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ३० जूनपासून पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारच्या वतीने मराठा आरक्षण उपसमितीचे प्रमुख तथा कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड यांनी शुक्रवारी (दि.२९) अंतरवाली सराटी येथे जरांगे पाटील यांची भेट घेतली. तत्पूर्वी त्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात जाऊन जात प्रमाणपत्राबाबत आढावा घेतला.

यावेळी मंत्री विखे पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आतापर्यंत किती प्रमाणपत्रे दिली, काय काय कार्यवाही केली याची माहिती दिली. जसे अर्ज येतील तशी कार्यवाही सुरू आहे. त्यामध्ये सुधारणा सुरू आहेत. जिथे हलगर्जीपणा होत आहे तिथे कारवाईच्या सूचना दिलेल्या आहेत. अडचणी येत आहेत, पण त्या दूर करण्याच्या सूचना दिल्या असून सुधारणा करून पुन्हा काम जोराने सुरू करणार आहोत, असे सांगितले.

# पनवेलमध्ये सोमवारी भव्य सांगीतिक कार्यक्रम

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त पर्वणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ तसेच नादब्रह्म साधना मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि.१ जून रोजी सायंकाळी ५ वाजता पनवेल येथे “स्वर संध्या” या भव्य सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणार असून रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याचा गौरव करण्यासाठी अमृत महोत्सव वर्ष विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येत आहे. त्याचाच




एक भाग म्हणून आयोजित “स्वर संध्या” या कार्यक्रमात संगीतप्रेमींसाठी दर्जेदार आणि सुरेल संगीताची मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका सारेगमप लिटल चॅम्प फेम अंजली गायकवाड तसेच ज्ञानेश्वरी धाडगे आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

कार्यक्रमाला पं. प्रतापबुवा पाटील यांची मृदंग साथ, प्रसाद पाध्ये यांची तबला साथ तसेच सूर्यकांत सुर्वे यांची तालवाद्यावर साथ लाभणार आहे. अनुभवी कलाकारांच्या साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक वाढणार आहे. याशिवाय नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा यांच्या वतीने सुरेल भजन सादर करण्यात येणार असून गायिका शिवमाला पाटील, पखवाज वादक निलेश पाटील व तबला साथीसाठी मृगेंद्र कडू हे कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर मडके करणार आहेत. संगीत, भजन आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम असलेल्या या अविस्मरणीय मैफलीचा लाभ रसिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जूनमध्येही उष्णतेची लाट राहणार कायम

### हवामान विभागाचा अंदाज, यंदा कमी पर्जन्यमान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय हवामान विभागाने जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या मान्सूनचा सुधारित अंदाज जाहीर केला असून यंदा देशभरात सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. एवढेच नाही तर मान्सूनचा सुरुवातीचा महिना म्हणजेच जूनमध्ये देशाच्या बहुतांश भागांत पाऊस सरासरीपेक्षा कमी असेल आणि महाराष्ट्रासह अनेक राज्यांत उष्णतेची लाट जाणवेल, असा अंदाज यामध्ये हवामान विभागाने वर्तवला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार या वर्षी नैऋत्य मान्सूनचा एकूण पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के राहण्याची शक्यता आहे. देशात सामान्यपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता तब्बल ८४ टक्के आहे. याचे मुख्य कारण म्हणजे प्रशांत महासागरामध्ये सध्या तटस्थ असलेली ‘एल निनो’ची स्थिती आता बदलत असून तो मान्सूनच्या काळात पूर्ण सक्रिय होण्याचा अंदाज आहे.

दरम्यान, २९ ते ३१ मेदरम्यान उत्तर-पश्चिम, मध्य आणि पूर्व भारतात वादळी वारे वाहण्याची आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

## निवडक

### कर्नाटकमध्ये शेतजमिनीच्या वादातून सहा जणांची हत्या

**विजयपुरा :** कर्नाटकच्या विजयपुरा जिल्ह्यातील गोविंदपूर गावात शेतजमिनीच्या वादातून सहा जणांची हत्या करण्यात आली आहे. मृतांपैकी पाच जण एकाच कुटुंबातील असल्याचे समजते. प्रदीर्घ काळापासून चालत आलेल्या वादाने शुक्रवारी (दि.२९) हिंसक वळण घेतले. गोलगी कुटुंबातील सदस्यांनी पूर्वनियोजित कट रचून निराळे कुटुंबावर हल्ला चढवत अंदाधुंद गोळीबार केला. या प्रकरणी आरोपींविरोधात स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सखोल तपास सुरू आहे.

### होर्मुज सामुद्रधुनीतून आणखी एक जहाज भारताकडे रवाना

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीदरम्यान भारतासाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. आणखी एक भारतीय जहाज होर्मुज सामुद्रधुनी पार करण्यात यशस्वी झाला आहे. ‘निसोस केरोस’ नावाचे हे जहाज विशाखापट्टणमकडे जात असून ते ३ जूनपर्यंत तेथे पोहचण्याची शक्यता आहे.

## कर्जतमध्ये नदीत बुडून दोघांचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील अंजप गावाजवळून वाहणाऱ्या पेज नदीत बुडून दोन विवाहित तरुणांचा मृत्यू झाला. मृत्युमुखी पडलेले दोघेही जिवलग मित्र असून आपल्या इतर मित्रांसोबत फिरण्यासाठी तसेच नदीत पोहण्याचा आनंद घेण्यासाठी आले होते.

अजय भास्कर म्हसे (वय ३२, रा. वारे, ता. कर्जत) आणि सुनील महेंद्र प्रजापती (वय ३१, रा. चाफेकरनगर, शिवाजीनगर, पुणे) अशी मृतांची नावे आहेत. ते मित्र व कुटुंबियांसह २७ मे रोजी अंजप परिसरातील पेज नदीवर आले होते. सायंकाळी सहाच्या सुमारास दोघेही नदीत उतरले असता टाटा पॉवरचे पाणी अचानक नदीपात्रात वाढल्याने दोघांनाही त्याचा अंदाज आला नाही आणि ते पाण्यात बुडाले.

पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने शोधमोहीम राबवून दोघांनाही पाण्याबाहेर काढून भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटलमध्ये आणले. तेथे डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## पाताळगंगा बंधाऱ्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**चौक : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पातळगंगा नदीच्या बंधाऱ्याखाली बुडून संचित (पूर्ण नाव माहीत नाही, वय २९, रा. मूळ उत्तर प्रदेश) याचा मृत्यू झाला. गुरुवारी नेहमीप्रमाणे कामावरून सुटल्यावर संचित व सहकारी अंघोळीसाठी गेले होते, मात्र संचित पाण्यात बुडाला. रसायनी पोलीस, अपघातग्रस्त टीम व हेल्प फाऊंडेशन यांनी त्याचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला, मात्र अंधार झाल्याने शोधमोहीम थांबवण्यात आली. पुन्हा शुक्रवारी (दि.२९) सकाळी शोधाशोध केल्यावर मृतदेह सापडला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.



पनवेल : ठाकूर इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा.लि. (टीआयपीएल) कंपनीचे लेखा विभागाचे महाव्यवस्थापक अरुण नाईक हे ४२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून सोमवारी निवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांनी त्यांचा कंपनीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल सन्मान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मल्हार नेटवर्क प्रा.लि.चे संचालक स्वप्नील ठाकूर, ‘टीआयपीएल’चे अॅडमिनीस्ट्रेशन मॅनेजर सतीश उगले, सुरज ढाणे, विनोद पाटील, कादिर शेख उपस्थित होते.



# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्वच्छता, शिस्त आणि टापटीपपणाच्या संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीत उतरवणाऱ्या पुणे विभागातील बारामती बसस्थानकाने राज्यातील 'अ' वर्ग बसस्थानकांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला असून, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत' १ कोटी रुपयांचे बक्षीस मिळविले आहे. खऱ्या अर्थाने ही कामगिरी अजितदादांच्या कल्पक, दूरदर्शी आणि कार्यक्षम कार्यशैलीला वाहिलेली आदरांजली असल्याचे भावनिक उद्गार परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काढले. ते या अभियानाचा वार्षिक निकाल जाहीर करताना बोलत होते.

या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातील ५४ बसस्थानकांना एकूण ३ कोटी रुपयांची बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत.



एसटी महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त, दि. १ जून रोजी मुंबई येथे या बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर राबविण्यात आलेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानाला' राज्यभरातील बसस्थानकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभियानामुळे स्वच्छता, सुशोभीकरण, प्रवासी सुविधा आणि व्यवस्थापनामध्ये उल्लेखनीय सुधारणा झाल्याचे दिसून आले आहे.

सन २०२५-२६ च्या सर्वेक्षणानुसार राज्यातील 'अ' वर्गात पुणे विभागातील बारामती बसस्थानकाने ९७ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. 'ब' वर्गात भंडारा विभागातील लाखणी बसस्थानकाने ९७ गुण मिळवत अव्वल स्थान मिळविले, तर 'क' वर्गात अहिल्यानगर विभागातील अकोले बसस्थानकाने ९८ गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. प्रादेशिक विभागनिहाय निकालात छत्रपती संभाजीनगर विभागातील औरसा नवीन, मुंबई विभागातील रत्नागिरी, नागपूर विभागातील चंद्रपूर, पुणे विभागातील बारामती, नाशिक विभागातील सटाणा आणि अमरावती विभागातील उमरखेड या बसस्थानकांनी आपल्या-आपल्या विभागात प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली

या अभियानामुळे बसस्थानक परिसरातील स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध मूलभूत सुविधा, सुशोभीकरण, स्वच्छतागृहांची देखभाल, हरित उपक्रम तसेच कर्मचारी सहभाग या सर्व बाबींमध्ये सकारात्मक बदल घडून आला आहे. अनेक बसस्थानकांनी स्थानिक स्तरावर अभिनव उपक्रम राबवून प्रवाशांसाठी आकर्षक, स्वच्छ आणि आनंददायी वातावरण निर्माण केले आहे.

## अल्पवयीन मुलीला गरोदर करून लग्नास नकार, तरुणाला अटक

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील मौजे सोंडेवाडी येथील एक तरुणी वय वर्ष १७ हिच्या शी शारीरिक संबंध ठेवून तिला आठ महिन्याची गरोदर करण्यात आल्यावर देखील संबंधित तरुणाने लग्नास नकार दिला. त्यामुळे पीडित तरुणीने व तिच्या कुटुंबीयांनी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

विशेष म्हणजे खालापूर तालुक्यात गुन्हा दाखल झाल्यावर अवघ्या तीन तासांत पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या, कर्जत तालुक्यातील दुर्गम भागातील आदिवासीवाडी आशाणे येथे कोणतेही नेटवर्क नसताना, आरोपीचा थांगपत्ता नसताना तेजस राम सांबरी याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

आपल्या आई वडिलांच्या सोबत सोंडेवाडी ता.खालापुर जि. रायगड येथे राहतें. तिचे वडील मोलमजुरी काम करतात पीडित मुलगी आश्रम शाळेत शिकत असून इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत आहे. पीडित मुलीच्या काकाचे मुलाची हळद कार्यक्रमात आषाणेवाडी कर्जत येथे गेली होती, त्यावेळी तेजस जवळ तिची ओळख झाली, त्यानंतर मुलगी आश्रम शाळेत शिकण्यासाठी गेल्यावर इंन्स्टा आयडी फॉलो करून तेजस याने मैत्री वाढवली.हा तरुण पिड़ीत मुलीच्या वाढदिवसाला शाळेवर केक घेवुन गेला होता, अशी माहिती मिळाली आहे. मैत्री जास्त वाढली व मैत्रिचे रूपांतर प्रेमात झाले.

तेजस अधुन मधुन सोंडेवाडी येथे यायचा. नोव्हेबर २०२४ मध्ये तेजस हा सोंडेवाडी येथे रात्री ११.०० वाजताचे सुमारास आला व येथील जि.प. शाळा येथे बोलावुन घेतले. त्यांनतर तो तरुणीशी लगट करू लागला. तुझे सोबत लग्न करायचे आहे, तुला काही कमी पडु देणार नाही, मला घेवुन सोंडेवाडी येथील जि.प. शाळाचे पाठीमागे घेवुन गेला. लग्न करायचे आहे,असे सांगून जबरदस्तीने शारीरीक संबंध केले. पीडितेचे आई वडील काम करतात, त्या ठिकाणी यायला लागला, त्याठिकाणी देखील शारिरीक संबंध ठेवले. असे मुलीने सांगितले.

जानेवारी २०२५ मध्ये पीडित तरुणीला घेवुन तो त्याचे घरी आषाणे ता. कर्जत गेला. त्यांनतर पीडित तरुणी आणि तेजस सोबतच राहत होते. पीडित तरुणीने लग्न करूया असा हट्ट धरल्यावर आज करू उदया करु, असे बोलायचा व विषय टाळाटाळ करायचा. नोव्हेंबर २०२५ मध्ये ती गरोदर असल्याचे समजले. गरोदर असतानाही तो शारीरीक संबंध करायचा.२६ मे २०२६ रोजी मला दुस-या मुलीसोबत रहायचे असे म्हणुन त्याने पीडितीला घरातुन बाहेर काढले. त्यामुळे याप्रकरणाला वाचा फुटली, खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उप निरीक्षक शिवाजी जुंदरे, पोहा.सोनावणे,शेवाळे पुढील तपास करत आहेत.

## मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत काटेतळी ग्रामपंचायत प्रथम

**पोलादपूर : प्रतिनिधी**


ग्रामस्वच्छता अभियान आणि अन्य स्पर्धांमध्ये राज्यात लक्ष्यवेधी यश संपादन करणाऱ्या पोलादपूर तालुक्यातील काटेतळी ग्रामपंचायतीने तालुकास्तरीय ७ सहभागी ग्रामपंचायतींमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील मूल्यमापन समितीने केलेल्या मूल्यमापनानंतर तालुक्यात सर्वप्रथम क्रमांक प्राप्त केला. यानंतर पुणे जिल्हास्तरिय समितीतर्फे मूल्यमापन करण्यात आल्याने ग्रामपंचायतअंतर्गत सेवाभावी जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

पुणे जिल्हा परिषदेचे भारतीय प्रशासकीय सेवा मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा जलसंधारण अधिकारी गौरव बोरकर, पत्रकार विठ्ठल जाधव, मुळशी पंचायत समिती कृषी अधिकारी सुमीत शिंदे, पुणे जिल्ह्यातील खेड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तुषार साळुंके तसेच मनरेगाचे साईराज प्रधान यांच्या पुणे जिल्हास्तरिय समितीतर्फे मूल्यमापनप्रसंगी काटेतळीचे सरपंच गौरव मोरे, माजी सरपंच सुनील मोरे, रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण व अर्थ सभापती चंद्रकांत कळंबे, पं.स.समिती सदस्य अनिल दळवी, पं.स.समितीचे ग्रामविस्तार अधिकारी हंबीर, ग्रामपंचायत अधिकारी शिल्पा कोंडाळकर, महसूल अधिकारी, कृषीसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशासेविका तसेच ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते

## रायगडच्या घाटात बसचा अपघात, सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगड माणगाव मार्गे येणाऱ्या एका खाजगी बसला रायगड घाटात एका वळणावरती अपघात झाला. संरक्षण कठड्याला ठोकून बस थांबल्याने पुढील मोठी दुर्घटना टळली. या बस मध्ये ४० प्रवासी प्रवास करत होते. चालकाच्या दुर्लक्षामुळे हा अपघात झाल्याचे प्रवाशांकडून बोलले जात होते. पुनाडे येथील स्थानिक ग्रामस्थांनी तात्काळ धाव घेत प्रवाशांना बसमधून बाहेर काढले.



मुंबई-गोवा महामार्गावरती माणगाव या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वाहन चालक निजामपूर रायगड अशा मार्गाने प्रवास करत असतात. अशाच प्रकारे पालघर ठाणे येथून ४० पर्यटकांना घेऊन निघालेली एक खाजगी बस निजामपूर मार्गे रायगड येथे जात असताना पुनाडे गावच्या हद्दीमध्ये घाटात उंच ठिकाणी एका वळणावर चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस संरक्षण कठड्याला आदळून अपघात झाला.

सुदैवाने या वेळी मोठी दुर्घटना टळली. अन्यथा बस जवळपास ६०० ते ७०० फूट दरीत कोसळून मोठे जीवित हानी झाली असती. यावेळेस पुनाडे येथील ग्रामस्थांनी धाव घेऊन प्रवाशांना बाहेर काढून, त्यांना चहा नाश्त्याची व्यवस्था करून त्यांना पाचाड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये उपचारासाठी दाखल केल्याची माहिती पुनाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जयेश लामजे यांनी दिली आहे. या अपघातामध्ये कोणालाही मोठी दुखापत झाली नाही.

मात्र सुदैवाने संरक्षण कठडा असल्याने सदर बसला मोठा अपघात होताना टळला असुन, ४० प्रवाशांचे प्राण वाचले आहेत. याप्रकरणी महाड तालुका पोलीस घटनास्थळी गेले असता कोणाची तक्रार नसल्याने याप्रकरणी अपघाती गुन्हा दाखल होऊ शकला नाही.

## कुडे लेणीकडे वळत आहेत पर्यटकांची पावले

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील कुडे लेणीकडे उन्हाळी सुट्टीत आलेली गावाकडील मंडळी सुट्टीत आवर्जून कुडे लेणीला भेट देत असून पर्यटनाचा आनंद घेताना दिसत आहेत.येथे १ ते २६ लेण्यांची सविस्तर माहिती क्युआर कोड द्वारे पाहून मिळते.

प्रसिध्द अशा या लेणी वर शिल्प चांगले आकर्षक व पाहण्यासारखे आहेत. लेण्यापाहण्यासाठी मुंबई,पुणे येथील पर्यटक कुडे लेणी पाहून मुरुड जंजिरा व समुद्र किनारी तसेच श्रीवर्धन, हरिहरेश्वर,दिवेआगर येथे जात आहेत.

प्रसिद्ध कुडे लेणीकडे जाण्यासाठी मुंबई- गोवा मार्गावरून इंदापूर येथून तळा हे अंतर १३ कीलोमिटर. पुढे तळा ते कुडे लेणी अंतर अंदाजे ५ की.मी.येवढे असून तारस्तेगावच्या पुढून कुडे लेणी वर जाता येते.

तसेच कुडे गावच्या मराठी शाळेजवळून जाता येते तळा हे मध्यवर्ती ठिकाण असून तळ्याहून मुरूडकडे जाणारा रस्ता व श्रीवर्धनकडे जाणारा रस्ता हा जवळचा असून हा रस्ताही चांगला असल्याने पर्यटकांना या मार्गाने पर्यटन करण्यास सोपे जात आहे.या रस्त्यामुळे वेळ व खर्चाची बचतही होत असते.

कुडे लेणी येथे सोई सुविधांची कमतरता भासत आहे.पर्यटकांना येथे राहण्याची व जेवणाची सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या मार्गावर मांदाड परिसरात एखादा रेस्टॉरंट झाल्यास पर्यटकांची अडचण सुटेल व पर्यटन अधिक बहरण्यास साह्यभूत ठरेल असे पर्यटकांतून म्हटले जात आहे.

## अतिदुर्गम निजामपूर आदिवासी पाड्यावर उजळले शिक्षणाचे दीप

**पाली : प्रतिनिधी**

रायगड किल्लचाच्या कुशीत वसलेल्या निजामपूर या अति दुर्गम आदिवासी पाड्यावर सारथी फाउंडेशनच्या अथक प्रयत्नांतून नव्या शाळेच्या इमारतीचे बांधकाम नुकतेच पूर्ण झाले आणि शाळेचे उद्घाटन उत्साहात पार पडले.

तालुका महाड, जिल्हा रायगड येथील या धरणग्रस्त पाड्यावर गेली सत्तावीस वर्षे अनेक आदिवासी कुटुंबे वास्तव्यास आहेत. एवढ्या दीर्घ काळातही येथे मूलभूत सुविधा आणि शैक्षणिक सोयींचा कायम अभाव राहिला.

पूर्वीची शाळा इमारत पूर्णपणे जीर्ण अवस्थेत होती. छोट्या व तात्पुरत्या खोल्यांमध्ये मुलांना दाटीवाटीने बसावे लागत होते. शाळेत वीजच नव्हती आणि वादळी वाऱ्यात ती इमारत थेट धोकादायक बनत होती. या परिस्थितीचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत होता.

रायगड जिल्ह्यात गेली चाळीस वर्षे दुर्गम भागात निस्वार्थपणे कार्यरत असलेले ज्येष्ठ समाजसेवक आणि सारथी फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जंगले यांच्या निदर्शनास ही दयनीय परिस्थिती आली आणि त्यांनी या विद्यार्थ्यांसाठी नवीन, सुरक्षित व सुसज्ज शाळा उभारण्याचा निर्धार केला. त्यांच्या पुढाकाराने सारथी फाउंडेशनच्या माध्यमातून आता येथे प्रशस्त वर्गखोली, वीज जोडणी, पंखे आणि ट्यूबलाईटसह सुसज्ज अशी नवी इमारत उभी राहिली आहे.

शाळेसाठी आवश्यक आर्थिक सहाय्य श्रीमती राजश्री महादेव सामंत यांनी त्यांचे सुपुत्र कै. सिद्धार्थ महादेव सामंत यांच्या पवित्र स्मरणार्थ दिले. एका मातेने आपल्या मुलाच्या आठवणीत दुसऱ्यांच्या मुलांसाठी शाळा उभारण्याचे हे कृत्य या सोहळ्याला खऱ्या अर्थाने भावपूर्ण करून गेले.

शाळेचे उद्घाटन मनिष पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले. या सोहळ्यास परिसरातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सारथी फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जंगले, महेश चव्हाण, निलेश पवार, प्राचार्य संदीप नगरकर ,गौरव जंगले, दिनेश डोके, प्रभाकर सावंत आणि गटशिक्षण अधिकारी राजन सुर्वे यांचीही या प्रसंगी उपस्थिती होती.

दुर्गम डोंगरकपारीत राहणाऱ्या आदिवासी मुलांच्या डोळ्यांत आता शिक्षणाचे नवे स्वप्न पाहण्याचे धाडस आले आहे आणि हीच या सगळ्या प्रयत्नांची खरी कमाई आहे.

## साखर सुतारवाडीतील आपदग्रस्तांना भूखंडवाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील २०२१ च्या नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित साखर सुतारवाडी या लोकवस्तीच्या पुनर्वसनकामांतर्गत तब्बल ५ वर्षांच्या कालावधीनंतर खासगीरित्या संपादित करण्यात आलेल्या भूखंडाचे वाटप करण्यात आले. महाडचे प्रांताधिकारी पोपट ओमासे यांच्या पुढाकाराने लॉटरीपध्दतीने बाधितांना भूखंडांचे वाटप करण्यात आले.



साखर सुतारवाडीतील भूस्खलनावेळी एकूण ७ जणांचे बळी गेल्यानंतर अनेक घरांच्या इमारतीदेखील बाधित झाल्याने या घरांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता निर्माण झाली. मात्र, शासनाकडून बाधित कुटूंबांच्या घरकुलासाठी केवळ ३ लाख ३० हजार रूपयांची आर्थिक सानुग्रह मदत देऊ केल्याने अद्याप ही तुटपुंजी रक्कम बाधितांनी स्विकारली नाही. यादरम्यान, बाधितांना घरकुल बांधून देण्याची मागणी जोर धरू लागली.

आतापर्यंत साखर सुतारवाडी येथे विद्युत पुरवठा, पाणी, अंतर्गत रस्ते, बस थांबा, क्रीडांगण, व्यायामशाळा, मंदिर, सभागृह आणि प्राथमिक शाळेच्या इमारतीसह सर्व नागरी सुविधा उभारण्यात आल्या असून प्रत्यक्ष बाधितांच्याच राहण्यासाठी निवासी संकुले उभारण्यात न आल्याने विविध सामाजिक संघटनांकडून आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला.

यानंतर शासन निर्णयानुसार खासगीरित्या संपादित जमिनीचे ४४ प्लॉट तयार करण्यात येऊन सोडतपध्दतीने क्रमनिहाय प्लॉटचे वाटप करून तातडीने प्लॉटचा ताबा बाधितांना देण्यात आला.

याप्रसंगी तहसिलदार कपिल घोरपडे, गटविकास अधिकारी उदय साळुंखे, उपसरपंच शिवाजी मालुसरे, विस्तारअधिकारी हंबीर, पं.स.कनिष्ठ अभियंता कांबळे, मंडल अधिकारी मंगेश पवार, ग्रामपंचायत अधिकारी भोसले व महसूल कर्मचारी साखर सुतारवाडी येथील भूखंडवाटपाच्या कार्यक्रमास उपस्थित होते.

## बेणसे, सिद्धार्थ नगरातील धोकादायक वीजखांब अखेर बदलले

**पाली : प्रतिनिधी**

बेणसे येथील सिद्धार्थ नगर परिसरातील गंजलेले, तळाशी पोखरलेले व धोकादायक अवस्थेतील वीजखांब अखेर महावितरण विभागाकडून तातडीने बदलण्यात आले आहेत. असून, संभाव्य दुर्घटना टळल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.



सिद्धार्थ नगर परिसरातील प्रवेशद्वाराजवळील तसेच समीर अडसुळे यांच्या घराजवळील विद्युत खांब पूर्णपणे गंजून जर्जर झाले होते. काही खांब एका बाजूला झुकलेल्या अवस्थेत असल्याने कोणत्याही क्षणी ते कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात होती. याशिवाय बेणसे मोहल्ला परिसरातील आशिफ मोमीन यांच्या घराजवळील धोकादायक पोलबाबतही नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या होत्या. येथील जुने

विशेष म्हणजे या भागात लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. पावसाळ्याच्या तोंडावर गंजलेल्या पोलमुळे जीवितास गंभीर धोका निर्माण झाला होता. जोरदार वारा किंवा पावसामुळे पोल कोसळून विजेच्या तारा तुटल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात होती.

या संदर्भातील वृत्त प्रसिद्ध होताच महावितरण विभागाने तातडीने दखल घेत संबंधित धोकादायक वीजखांब हटवून नवीन मजबूत पोल उभारण्याचे काम हाती घेतले. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळली.

## वाशी बाजारपेठेतील दुभाजकामध्ये ग्रीलचा अडथळा; व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाचे निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते ब्लू डायमंड परिसरातील दोन्ही बाजूंच्या मार्केटमधील सेक्टर-९,१०,१६ येथील व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आज नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात उपमहापौर दशरथ भगत यांची भेट घेतली. यावेळी व्यापाऱ्यांनी वाशीतील मुख्य बाजारपेठेतील दुभाजकामध्ये बसवण्यात आलेल्या लोखंडी ग्रीलमुळे ग्राहकांची मोठी गैरसोय उपमहापौरांना एक सविस्तर निवेदन सुपूर्द केले.



व्यापाऱ्यांनी या वेळी खरेदी-विक्रीसाठी येणाऱ्या ग्राहक आणि रहिवाशांच्या समस्येकडे उपमहापौरांचे लक्ष वेधले. वाशीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते ब्लू डायमंड हा रस्ता हा मुख्य 'मार्केट रस्ता' आणि प्रचंड रहदारीचा मार्ग असल्याने दुभाजकावर लावण्यात आलेली लोखंडी ग्रील ग्राहकांसाठी आणि खरेदी-विक्रीच्या व्यवहारांसाठी मोठी अडथळा ठरत आहे.

या ग्रीलमुळे ग्राहकांना रस्त्याच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला सहजतेने जाता येत नाही आणि म्हणूनच ग्राहकांची ही गैरसोय दूर करण्यासाठी मधली ग्रील तातडीने काढून टाकण्यात यावी यासाठी ही लोखंडी ग्रील तातडीने काढून टाकण्यात यावी, अशी मागणी व्यापाऱ्यांनी एका निवेदनाद्वारे केली. या समस्येवर सविस्तर चर्चा करून उपमहापौर दशरथ भगत यांनी बहुसंख्य ग्राहक आणि नागरिकांची ही मागणी रास्त असून प्रशासनाकडून यावर लवकरच कार्यवाही होईल असे सांगीतले

## दुखवटा

### चंद्रकांत कामथे

**धाटाव :** नागोठणे येथील चंद्रकांत लक्ष्मण कामथे (वय ७८) यांचे बुधवार, दिनांक २७ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगा, तीन विवाहित मुली, सुन, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



के. चंद्रकांत कामथे यांचा दशक्रिया विधी शुक्रवार, दिनांक ५ जून रोजी उद्धर (ता. सुधागड) येथे होणार असून उत्तरकार्य रविवार, दिनांक ७ जून रोजी आंगरआळी नागोठणे येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती कामथे कुटुंबीयांनी दिली.

# गरीबी दूर करण्याचे साधन म्हणजे शिक्षण -राज्यपाल हरिभाऊ बागडे

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण हे जीवनभर घेता येते, गरीबी दूर करण्याचे साधन शिक्षण आहे. त्यामुळे शिक्षण प्रत्येकाने घेतले पाहिजे. केवळ पैसा म्हणून त्याकडे पाहू नका असे मत राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांनी व्यक्त केले. २९ मे रोजी आयोजित पनवेल, शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीच्या तिसऱ्या दीक्षांत समारंभ वेळी ते बोलत होते.




या कार्यक्रमाला अध्यक्ष डॉ. केशव बडाया, प्रोफेसर केशरीलाल वर्मा, प्रोफेसर शेखर मांडे, डॉक्टर मेघेंद्र शर्मा, डॉक्टर आर पी शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ (CSMU), नवी मुंबईचा तृतीय पदवीदान समारंभ शुक्रवारी विद्यापीठ परिसरातील जी. डी. बडाया ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आला.

यावेळी विविध विद्याशाखांतील १२६८ विद्यार्थ्यांना पदव्या व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. या कायक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या राज्यपाल श्री बागडे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांच्या जीवनातून शौर्य, राष्ट्रभक्ती, कर्तव्यनिष्ठा आणि संघर्षाची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. पदवी प्राप्त करणे ही जीवनातील महत्त्वाची उपलब्धी असली तरी बौद्धिक आणि सामाजिक स्तरावरही स्वतःचा विकास करणे तितकेच आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय संस्कृतीची ओळख नैतिकता, प्रामाणिकपणा आणि सचोटी यांमध्ये असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या मूल्यांचे पालन करण्याचा सल्ला दिला. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि संस्कारांचा उपयोग समाज व राष्ट्राच्या विकासासाठी करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

समारंभाची सुरुवात विद्यापीठाचे कुलपती डॉ. केशव बडाया यांनी पदव्या व प्रमाणपत्रांना मान्यता देण्याच्या घोषणेद्वारे केली. यावेळी एकूण १२६८ पदव्या व प्रमाणपत्रांना मान्यता देण्यात आली. यामध्ये ३४ पीएच.डी., ५३५ पदव्युत्तर पदव्या तसेच विविध पदवी आणि इतर अभ्यासक्रमांच्या पदव्यांचा समावेश होता. डॉ. बडाया यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रख्यात शास्त्रज्ञ आणि सीएसआयआरचे माजी महासंचालक प्रा. (डॉ.) शेखर सी. मांडे यांनी विशेष अतिथी म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी नवोपक्रम, संशोधन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करत भारताच्या नेतृत्वाखाली जगाला नवी दिशा देण्याची वेळ आली असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी 'विकसित भारत' घडविण्यासाठी सक्रिय योगदान द्यावे आणि देशाचा गौरव वाढवावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) के. एल. वर्मा यांनी विद्यापीठाच्या वार्षिक प्रगती अहवालाचे सादरीकरण केले. शिक्षण, संशोधन, नवोपक्रम, कौशल्य विकास आणि उद्योग–शैक्षणिक सहकार्याच्या क्षेत्रात विद्यापीठ सातत्याने प्रगती करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

या समारंभाला विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# पनवेल महापालिकेकडून कळंबोलीत महापौर आपल्या प्रभागात स्वच्छता मोहीम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता आणि आरोग्याचा दर्जा सुधारण्यासाठी 'महापौर आपल्या प्रभागात' हा विशेष उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत शुक्रवारी कळंबोली येथील प्रभाग क्रमांक ८ मध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना आपला परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा संदेश देण्यात आला.या स्वच्छता मोहिमेत स्थायी समिती सभापती व नगरसेवक बबन मुकादम, नगरसेवक रामदास शेवाळे, नगरसेविका बायजा बारगजे आणि नगरसेविका सायली सरक यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून सहभाग घेतला. त्यांच्यासोबत महानगरपालिकेचे प्रभाग स्वच्छता अधिकारी हरेश कांबळे, दिपक म्हात्रे,जिग्नेश भोईर,अमित जाधव,अमोल कांबळे यांच्या सह स्वच्छता दूत आणि मोठ्या संख्येने सफाई कर्मचारी उपस्थित होते.मोहिमे दरम्यान लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मिळून प्रभागातील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते आणि सार्वजनिक परिसराची साफसफाई केली.

"माझा प्रभाग, स्वच्छ प्रभाग ही केवळ पालिकेची नसून प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक जबाबदारी आहे," असे आवाहन यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी केले. नागरिकांनी कचरा कुंडीतच टाकावा आणि ओला-सुका कचरा वेगळा करून पालिकेच्या गाडीत द्यावा, जेणेकरून कळंबोली परिसर अधिक सुंदर व निरोगी राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या मोहिमेला स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# चालत्या मोटरसायकलवरून महिलांचा विनयभंग करणाऱ्या विकृत इसमास अटक

**पनवेल : वार्ताहर**

चालत्या मोटरसायकलवरून महिलांचा विनयभंग करणाऱ्या विकृत इसमास रबाळे पोलिसांनी अटक केली आहे.



एक २२ वर्षीय तरुणी तिच्या मैत्रिणीच्या घरी जात असताना सेलिब्रेशन बिल्डिंगच्या मागील गेटसमोर, सेक्टर ०६, ऐरोली येथे आल्या असता आरोपीने त्याच्याजवळ असलेल्या बर्गमन कंपनीच्या पांढऱ्या रंगाच्या स्कुटीवरून फिर्यादीचा पाठलाग करून त्यांच्या विनयभंग करण्याच्या उद्देशाने त्यांच्या पाठीमागील पार्श्वभाग पकडून दाबून तेथून पळ काढला. त्यानंतर फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदर गुन्हा दाखल करण्यात आला.

वपोनि बाळकृष्ण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन गवळी (गुन्हे) व पोलीस निरीक्षक श्याम बनसोडे (प्रशासन) यांच्यासह सपोनि अविनाश पाळदे,पोउनि राहुल गरड,पोहवा दर्शन कटके, पोहवा वायंगणकर, पोहवा मयूर सोनवणे, पोशि मनोज देडे व पोशि यादवराव घुले या पथकाने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळावरील प्राथमिक माहिती घेतली.

घटनास्थळाचे प्राप्त सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास तसेच गुप्त बातमीदारामार्फत आरोपीचा शोध घेऊन आरोपी कृष्णा महेंद्र कनोजिया, वय २१ यास ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

# 'एनयुएचएम' सहाय्यक संचालकांची पनवेल महानगरपालिकेत भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानच्या सहाय्यक संचालक दिप्ती देशमुख यांनी पनवेल महानगरपालिकेस आज दिनांक २९ मे रोजी भेट देऊन माहिती घेतली. महापालिका देत असलेल्या सेवा सुविधांबाबत यावेळी त्यांनी समाधान व्यक्त करून कौतुक केले. आयुक्त मंगेश चितळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांना महापालिकेच्यावतीने नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती देण्यात आली. यानिमित्ताने घेतलेल्या बैठकिस महापालिकेचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सर्व वैद्यकिय अधिकारी उपस्थित होते.



पनवेल महानगरपालिकेच्या १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, दोन आपला दवाखना व चार आरोग्यवर्धिनी केंद्रांच्या माध्यमातून पालिका क्षेत्रातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरविल्या जातात. याबाबत सहाय्यक संचालक दिप्ती देशमुख यांनी या सर्व सेवा सुविधांचा पनवेल महानगरपालिकेस भेट देऊन आढावा घेतला.

यावेळी त्यांनी पालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून देत असलेल्या दैनंदिन सर्वसाधारण आरोग्य तपासणी व उपचार, माता व बाल संगोपन सेवा,लसीकरण कार्यक्रम, गर्भवती महिलांची तपासणी व मार्गदर्शन ,कुटुंब नियोजन सेवा, क्षयरोग, मलेरिया, डेंग्यू आदी संसर्गजन्य रोगांचे निदान व उपचार, रक्तदाब, मधुमेह यांसारख्या असंसर्गजन्य आजारांची तपासणी, मोफत औषध वितरण, प्रयोगशाळा तपासणी सुविधा, आरोग्य जनजागृती व समुपदेशन, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी, स्वच्छता व रोग प्रतिबंधक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन या सर्व सेवा सुविधांची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी त्यांना माहिती दिली.

प्राथमिक आरोग्य् केंद्रातील शहर कार्यक्रम अधिकारी, प्रयोगशाळा स्टाफ, परिचारिका, साथरोगतज्ञ, आशा सेविका यांबाबातही सविस्तर आढावा घेतला व. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६ला भेट देली.

# मोरबे सर्कल नवी मुंबई विमानतळाजवळील सर्वात मोठे विकास हब ठरण्याची शक्यता

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या वडोदरामुंबई एक्सप्रेसवे स्पर पॅकेज XVIII अंतर्गत मोरबे ते करंजाडे/मुंबई–पुणे एक्सप्रेसवे या नवीन महामार्ग कनेक्टिव्हिटीची अलाइनमेंट मंजुरीच्या स्थितीत असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रस्तावित मार्गाची लांबी सुमारे ९.४६४ किलोमीटर असून, हा मार्ग ग्रीनफिल्ड ८–लेन कनेक्टिव्हिटी म्हणून विकसित होण्याची शक्यता आहे.

या अलाइनमेंटमुळे मोरबे सर्कल हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील सर्वात मोठे विकास हब आणि महत्त्वाचे सर्कल ठरण्याची शक्यता आहे. मोरबे सर्कलमधून नवी मुंबई विमानतळ, मुंबई–पुणे एक्सप्रेस वे, जेएनपीटी, तळोजा एमआयडीसी, नैना क्षेत्र, लॉजिस्टिक पार्क, डेटा सेंटर आणि नियोजित टाऊनशिप विकास यांना मजबूत कनेक्टिव्हिटी मिळू शकते. या मार्गामुळे तळोजा, मोरबे, वांगणी तर्फे तळोजा आणि पनवेल परिसरातील पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळेल. भविष्यात या भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, औद्योगिक विकास, लॉजिस्टिक सुविधा आणि नियोजित शहरीकरण वाढण्याची शक्यता आहे.प्रकाशबाविस्कर, अध्यक्ष, नैना बिल्डर वेल्फेअर असोसिएशन यांनी सांगितले की, मोरबे ते करंजाडे ही प्रस्तावित महामार्ग कनेक्टिव्हिटी या संपूर्ण परिसरासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ही अलाइनमेंट मंजूर झाल्यास मोरबे सर्कलचे महत्त्व अनेक पटींनी वाढेल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ असलेले मोरबे सर्कल भविष्यात या भागातील सर्वात मोठे विकास हब आणि प्रमुख कनेक्टिव्हिटी सर्कल ठरू शकते.

वांगणी तर्फे तळोजा आणि तळोजा–मोरबे परिसरात आधीच नियोजित विकासाची मोठी क्षमता आहे. या नवीन कनेक्टिव्हिटीमुळे या भागातील जमीन, टाऊनशिप, लॉजिस्टिक, डेटा सेंटर आणि औद्योगिक गुंतवणुकीचे महत्त्वआणखी वाढणार आहे.मोरबेकरंजाडे महामार्ग अलाइनमेंट मंजुरीच्या स्थितीत आल्यास नवी मुंबई विमानतळ परिसराच्याविकासाला नवी दिशा मिळूशकते. या कनेक्टिव्हिटी मुळे मोरबे सर्कल हे नवी मुंबई विमानतळाजवळील भविष्यातील सर्वात मोठे विकास केंद्र म्हणून पुढे येण्याची शक्यता आहे.

# गांजासह गावठी दारूचा साठा हस्तगत; चार आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खैरणे गाव येथे एका घरामध्ये पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने छापा टाकून तेथून गांजा या अंमली पदार्थासह गावठी दारूचा साठा असा मिळून जवळपास १७८३००/- रुपये किमतीचा बेकायदेशीररित्या केलेला साठा हस्तगत केला असून या प्रकरणी चार जणांना ताब्यात घेण्यात आले आहे .

खैरणे गावातील एका घरामध्ये बेकायदेशीररित्या गांजा या अंमली पदार्थासह गावठी दारूचा साठा करून ठेवण्यात आल्याची माहिती वपोनि गजानन घाडगे याना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अनुरुद्ध गिजे, पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत, पोहवा विजय देवरे, महेश धुमाळ, सतीश तांडेल, सुनील कुदळे, शिवाजी बाबर, भूषण म्हारसे, पोशी आकाश भगत आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून जवळपास १७८३००/- रुपये किमतीचा बेकायदेशीररित्या केलेला साठा हस्तगत केला असून या प्रकरणी महेश म्हात्रे वय (३०) नागा उर्फ नागेश्वर उर्फ मनेसवार लोंगसिंग रॉगपी, वय २९ वर्षे,अभिषेक दळवी, वय २४ वर्षे व मनोज पाटील, वय २७ वर्षे याना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात एन.डी.पी.एस. कायदां कलम ८ (क), २०(ब), २२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

# मालडुंगेचे सरपंच सीताराम चौधरी स्वच्छतेसाठी थेट उतरले गटारात!

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील आदिवासी भागात येणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत मालडुंगे अंतर्गत धोदाणी गावात स्वच्छतेसाठी सरपंच सिताराम चौधरी यांनी केलेल्या कृतीची सर्वत्र चर्चा होत आहे. नागरिकांनी गटारांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, असे आवाहन त्यांनी अनेकदा केले होते. मात्र काही नागरिकांकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने सरपंच चौधरी यांनी थेट गटारात उतरून साफसफाई करत जबाबदार लोकप्रतिनिधीचे आदर्श उदाहरण घालून दिले.



पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर गटारांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, कचरा आणि गाळ साचल्याने पावसाचे पाणी तुंबण्याचा तसेच रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला होता. वारंवार सूचना देऊनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने सरपंच सिताराम चौधरी यांनी स्वतः फावडे हाती घेत गटारातील कचरा बाहेर काढण्याचे काम केले. धोदाणी परिसरातील नाल्यांचे काँक्रिटीकरण करण्यात आले असले तरी नागरिकांकडून टाकला जाणारा कचरा नदी व धरणाच्या पाण्यात मिसळून पर्यावरण आणि आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करत आहे.

याच पार्श्वभूमीवर सरपंचांनी स्वतः स्वच्छता मोहिमेत सहभागी होत जनजागृतीचा प्रभावी संदेश दिला. सरपंच स्वतः गटारात उतरून काम करत असल्याचे पाहून गावकऱ्यांनाही आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली.

त्यांच्या या कृतीचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, "केवळ सूचना देणे नव्हे तर स्वतः पुढे येऊन काम करणे" हीच खरी लोकसेवा असल्याचे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे.


# एकाच दिवशी दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

**नवीन पनवेल :** शिरढोण पाडा येथून एकाच दिवशी दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात २७ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. २५ मे रोजी सायंकाळच्या सुमारास अनिल मनोहर जाधव यांची पंधरा वर्षीय मुलगी तसेच राम राठोड यांची तेरा वर्षीय मुलगी यांचे अज्ञात इसमाने अपहरण केले. पंधरा वर्षीय मुलीची उंची पाच फूट, बांधा सडपातळ, रंग काळा असून अंगात पंजाबी ड्रेस लाल रंगाचा घातला आहे. तिला मराठी आणि वडारी भाषा बोलता येते, तर तेरा वर्षीय मुलीची उंची अंदाजे तीन फूट, बांधा मजबूत, रंग नीम गोरा आहे. तिने अंगात काळी जीन्स पॅन्ट, पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट घातला आहे.

# खारघर नोडमधील ११५ झोपड्या, १२ व्यावसायिक स्टॉल जमीनदोस्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघर नोडमध्ये वाढत्या अनधिकृत बांधकामांविरोधात सिडकोने धडक कारवाई करत तब्बल ११५ झोपड्या, १२ व्यावसायिक स्टॉल तसेच पत्र्याचे अनधिकृत कंपाऊंड निष्कासित केले. सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने ही कारवाई केली.



कारवाईदरम्यान सेक्टर ८ मधील अंदाजे २००० चौरस मीटर क्षेत्रावरील ४० झोपड्या हटविल्या. तर सेक्टर ११ येथे अंदाजे ४००० चौरस चौरस क्षेत्रावरील सेक्टर ३६ मधील भूखंड क्रमांक ५ए वरील ५०० चौरस मीटर क्षेत्रफळावर उभारलेले पत्र्याचे अनधिकृत कंपाऊंड यावेळीजमीनदोस्त करण्यात आले.

# लाथाबुक्क्यांनी मारहाण करून पाय केला फ्रॅक्चर

**नवीन पनवेल :** सात आणि आठ वर्षीय मुले मोबाईलवर अश्लील फोटो आणि व्हिडिओ पाहत असताना फिर्यादीने दोघांच्या कानाखाली मारली. याचा राग आल्याने फिर्यादीला चौघा जणांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली आणि कोणत्यातरी वस्तूने पायावर मारून त्यांचे पायाचे हाड फ्रॅक्चर केले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात २८ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील फिर्यादी हे टिटवाळा येथे राहत असून ते त्यांच्या बहिणीच्या घरी नवीन पनवेल येथे गेले होते. यावेळी त्यांचा सात वर्षीय भाचा आणि आरोपीचा आठ वर्षीय नातू हे मोबाईलवर अश्लील फोटो आणि व्हिडिओ पाहत होते. त्यावेळी फिर्यादीने दोघांच्याही कानाखाली मारली. या गोष्टीचा राग आल्याने चारही आरोपींनी मिळून फिर्यादीला लाथाबुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली आणि एका आरोपीने त्याच्या पायावर मारून पायाचे हाड फ्रॅक्चर केले.

# रसायनीत पिण्याचा पाणीपुरवठा बंद झाल्याने नागरिकांची तारांबळ

**मोहोपाडा :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन आजिवली गावाजवळ फुटल्याने रसायनी सह आसपासच्या परिसरातील पाणीपुरवठा ४० तास बंद होता.यामुळे रसायनीतील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय झाली.



पाणी नसल्यामुळे नागरिकांनी नदी व तलावात अंघोळ केली तर नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचे जार विक्रेत्यांकडे जावून पाणी विकत घेतले आहे.यावेळी ग्रामपंचायत सदस्यांनी आपापल्या प्रभागात पाण्याचे टॅंकर पाठवून पाणीपुरवठा सुरु ठेवला.यावेळी मोहोपाडा परिसरात टॅंकरमधील पाणी घेण्यासाठी महिला व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. एकंदरीत रसायनी परिसरात पाण्यासाठी मोठी धावपळ पहावयास मिळाली .

## संपादकीय

# अंतरात्म्याचा आवाज!

विवेक आणि अंतरात्म्याचा आवाज यांची दखल घेणारी मानसिकता अजूनही राजकारणात आहे, आणि मोहापासून दूर राखण्याची ताकद आवाजात आहे, याचा याहून वेगळा पुरावा कोणता असू शकतो?

**राजकारण हे नेहमीच सत्तेच्या वर्तुळाभोवती फिरते हा समज खोटा ठरविणारे अनेक प्रसंग याआधी देशाच्या राजकारणाने पाहिले आहेत. राहुल गांधी यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली तेव्हा सोनिया गांधी यांनी राहुल गांधी यांना सत्तेच्या राजकारणाचे इंगित सांगून त्यापासून सावध राहण्याचा सल्ला दिला होता. सत्तेचे राजकारण विषासमान असते असे त्या म्हणाल्या, तेव्हा राजकारणात मुरलेल्या अनेकांची हृदये तात्पुरती तरी हेलावून गेली होती. राजकारणाच्या कोलाहलात अंतरात्म्याचा आवाज कोणालाच ऐकू येत नाही असे म्हटले जाते, पण अंतरात्म्याचा आवाज ही केवळ कल्पना नाही, तर राजकारणातले वास्तवही आहे, हे काही दशकांपूर्वी देशाने अनुभवले होते. त्याचीच पुनरावृत्ती आता पश्चिम बंगालच्या राजकारणात घडताना दिसत आहे. वेगवेगळ्या यंत्रणांच्या कारवाईची भीती दाखवून नेत्यांची राजकीय कोंडी केली जात असल्याने पक्षबदल करून अनेकजण सत्तेच्या वळचणीस जातात असा समज असला, तरी अंतरात्म्याचा आवाज कानात घुमत राहिल्याने येणाऱ्या अस्वस्थतेचा परिणाम म्हणूनही पदत्यागाचे प्रायश्चित्त घेणारे नेते पश्चिम बंगालमध्ये आहेत, हे राजकारणाचे वेगळेपण म्हणावे लागेल. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीतील तृणमूल काँग्रेसच्या पराभवानंतर पक्षात नाराजी, असंतोष उफाळून आला. अनेकांनी सत्तेच्या तंबूत प्रवेश मिळविण्याची धडपड सुरू केली, पण याच तृणमूल काँग्रेसचे प्रवक्ते खासदार काकाला घोष दस्तीदार यांनी मात्र अंतरात्म्याचा आवाज ऐकून पक्षातील प्रवक्तेपदाचा राजीनामा दिला आहे. आपण पक्षात आहोत, पण पदावर राहणार नाही, असे सांगत त्यांनी आपल्या अंतरात्म्याच्या आवाजाला वाचा फोडली आहे. तृणमूल काँग्रेसच्या सत्ताकाळात पश्चिम बंगालमध्ये आर. जी. कर हॉस्पिटलमधील बलात्कार प्रकरण गाजले, नोकरी घोटाळ्याच्या आरोपांमुळे ममता सरकार बदनाम झाले, राज्यात अनैतिक कृत्यांचा कहर झाला, भ्रष्टाचाराने शिखर गाठले, अशी कबुली देणाऱ्या दस्तीदार यांना त्या काळात पक्षशिस्त म्हणून गप्प बसावे लागले तरी ते अस्वस्थ होते. पक्षाच्या अनेक धोरणांशी सहमत नसतानाही मूग गिळून गप्प बसण्याची वेळ येत होती, तेव्हा अंतरात्म्याचे काहूर त्यांना असह्य होत होते. आता सत्ता गेली, आणि त्यांचा अस्वस्थ अंतरात्मा त्यांना विवेकाची जाणीव करून देऊ लागला. आता आपला अंतरात्मा आपल्याला अशा कृत्यांची जाणीव करून देतो आणि अनैतिक कृत्ये, भ्रष्टाचार, घोटाळे, सिंडिकेट संस्कृती, गुंडगिरी, महिलांवरील अत्याचार, यांपासून दूर राहण्याचा इशारा देतो, असे सांगत त्यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. खरे म्हणजे, सत्तेत असताना नेतृत्वाभोवती दिसणारी एकजूट ही अनेकदा राजकीय व्यवहारांवर उभी असते. सत्तेचा केंद्रबिंदू नाहीसा झाला की अंतर्गत विसंगती वर येऊ लागतात. तृणमूल काँग्रेसमध्ये सध्या तेच चित्र दिसत आहे. पराभवानंतर पक्षातील नाराजीचे सूर उघडपणे व्यक्त होऊ लागले, नेतृत्वशैलीवर प्रश्नचिन्हे उमटली, तर काहींनी संघटनात्मक अधोगतीची कबुली दिली. पक्षातील अनेक कार्यकर्ते आणि स्थानिक नेते आता राजकीय आश्रय शोधण्याच्या मानसिकतेत असल्याचे दिसते. अशा काळात खासदार काकाला घोष दस्तीदार यांनी खासदारकी शाबूत ठेवून पक्षसंघटनेच्या जबाबदारीपासून स्वतःस दूर राखण्याचा घेतलेला निर्णय चिंतनीय म्हणावा लागेल. पराभवाने शिकविलेल्या या शहाणपणाचा कित्ता या पक्षातील अन्य नेत्यांनी गिरविला, तर कदाचित ते तृणमूल काँग्रेससाठी प्रायश्चित्त ठरू शकेल.**

# चला देशापुढे महाराष्ट्राच्या बचतीचा आदर्श ठेवूया!




ज्या ज्या वेळी देशावर संकट येते, त्या त्या वेळी महाराष्ट्र हा दिल्लीच्या मदतीला धावून जातो. "हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला" ही महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासूनची आपली भूमिका आजही तितकीच जिवंत आहे. युद्ध असो, टंचाई असो, महापूर असो की महामारी–महाराष्ट्राने प्रत्येक संकटात देशाच्या पाठीशी उभे राहत मदतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पश्चिम आशियातील वाढते तणाव आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आज देश पुन्हा एका मोठ्या आव्हानासमोर उभा आहे. या संकटाचा कालावधी किती असेल हे आपल्या हातात नसले, तरी या अशा काळात संयम, शिस्त आणि बचत यामधून देशाच्या अर्थकारणाला बळ देण्याचे मोठे काम महाराष्ट्र करु शकतो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सर्वप्रथम आवाहन केले. त्यांनी देशवासियांना केलेले आवाहन हे केवळ खर्च कमी करण्याचे नाही, तर राष्ट्रहितासाठी जीवनशैली बदलण्याचे आहे. 'जितकी बचत, तितकी राष्ट्रसेवा' हा संदेश त्यांनी अत्यंत स्पष्टपणे दिला आहे. अनावश्यक इंधन वापर टाळणे, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करणे, 'वर्क फ्रॉम होम'ला प्रोत्साहन देणे, स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार वाढवणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा बचत करणे अशा अनेक बाबींवर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार करता महाराष्ट्र शासनानेही तातडीने व्यापक उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कृतीतून या संदेशाला विश्वासार्हता दिली आहे. विधान भवनात त्यांनी स्वतः दुचाकी चालवत केलेला प्रवेश हा केवळ प्रतिकात्मक नव्हता; तो प्रशासन आणि समाजाला दिलेला स्पष्ट संदेश होता. बचत ही फक्त भाषणातली गोष्ट नसून ती आचरणात उतरली पाहिजे. बंगळुरु येथील कार्यक्रमासाठी त्यांनी खासगी वा चार्टर्ड विमानाऐवजी प्रवासी विमानाने प्रवास केला, हीदेखील त्याच विचारसरणीची प्रचिती होती. नेतृत्व जेव्हा स्वतः उदाहरण घालून देते, तेव्हा समाज अधिक वेगाने बदल स्वीकारतो. त्यामुळे येत्या काळात नेतृत्वाचा संदेश तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कसब प्रशासनाला दाखवायचे आहे. तर अगदी गाव पातळीवरुन शिस्तीत सूचनांची अंमलबाजवणी करायची आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला या परिस्थितीत काय करावे. या संदर्भातील सुस्पष्ट आदेश दिले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या सूचनांमध्ये अनेक महत्त्वाच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरे स्थगित करण्यात आले आहेत. कार्यालयीन कामासाठी वाहनांचा कमीत कमी वापर, शक्य असल्यास कारपूलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि आठवड्यातून एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सूचनांमधून केवळ इंधन बचतच नव्हे, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचाही संदेश दिला जात आहे.

आजच्या काळात ऊर्जा बचत हीच खरी राष्ट्रभक्ती ठरत आहे. शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा आणि संगणक बंद ठेवण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. वातानुकूलन यंत्रणांचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा निर्णयही त्याचाच भाग आहे. प्रत्येक युनिट वीज वाचवणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील भार कमी करणे, ही भावना आता रुजवली जात आहे.

ऊर्जेच्या पर्यायी साधनांवरही शासनाने विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत घराघरात सौरऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीस गती दिली जात आहे. पीएनजीच्या वापराला चालना देण्यासाठी मोठ्या शहरांतील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना प्रोत्साहन दिले जात आहे. ही केवळ बचतीची नव्हे, तर भविष्यातील शाश्वत विकासाची दिशा आहे.

शासनाने डिजिटल आणि ऑनलाइन पद्धतींचा वापर वाढवण्यालाही प्राधान्य दिले आहे. मंत्रालयीन, विभागीय आणि जिल्हास्तरीय बैठका शक्य तितक्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कार्यालयीन कार्यपद्धती अधिक स्मार्ट आणि मितव्ययी बनवण्याची ही योग्य वेळ आहे.

बचतीचा हा विचार केवळ शासनापुरता मर्यादित राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेणे आवश्यक आहे. घरातील अनावश्यक वीज वापर कमी करणे, खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतूक वापरणे, स्थानिक आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाण्याचा संयमाने वापर करणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. राष्ट्रनिर्मिती ही फक्त सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव आता अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे.

कृषी क्षेत्रातही बचत आणि शाश्वततेचा विचार पुढे येत आहे. रासायनिक खतांचा अतिरेक कमी करून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. माती परीक्षण, पिकनिहाय खतांचा वापर आणि योग्य कृषी व्यवस्थापन याद्वारे खर्च कमी करताना उत्पादनक्षमता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली तर देशाची आर्थिक घडीही अधिक सक्षम राहते, हे महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे महाराष्ट्राने सुरुवात केली आहे. यातून एक घडी बसेल. यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्राची परंपरा ही फक्त संघर्षाची नाही, तर संकटावर मात करत देशाला दिशा देण्याची आहे. सहकार चळवळ असो, उद्योगधंद्यांची प्रगती असो किंवा सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्राने नेहमीच देशाला आदर्श दिला आहे. आज पुन्हा एकदा तशीच वेळ आली आहे. बचत, संयम आणि जबाबदारी या तीन सूत्रांवर महाराष्ट्र चालला, तर देशासमोर एक नवा आदर्श उभा राहू शकतो.

आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुरू केलेली ही मोहीम प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. गावपातळीपासून शहरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांनी या बचतीच्या यज्ञात आपला सहभाग नोंदवला, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा देशासाठी प्रेरणास्थान ठरेल.

कारण संकटे येत राहतात, पण संकटाच्या काळात देशासाठी उभा राहणारा महाराष्ट्र हा नेहमीच अधिक मोठा दिसतो. महाराष्ट्राचे दातृत्व जसे मोठे आहे तसेच राज्याचे कर्तृत्व आणि जबाबदारीही महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून पुढे येऊया! प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊया! देशाला आत्मनिर्भर आणि आणखी मजबूत करुया!

**–प्रवीण टाके, उपसंचालक, (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**



## बदलते तंत्रज्ञान

### 'आधार'धारकांसाठी नवीन ॲप; डिजिटल सुविधा मिळणार

UIDAI म्हणजेच mAadhaar ॲप हा लवकरच बंद होणार आहे, मग आता लोकांना नवा ॲप कोणता असणार आहे. mAadhaar ॲप बंद झाल्यानंतर नागरिकांना नवा आधार ॲप वापरण्यासाठी सांगण्यात आले आहे. आधार ॲपमध्ये लॉग इन करणे अनिवार्य आहे.




नवीन आधार ॲपचे वैशिष्ट्य सांगायचे झाले तर यामध्ये नागरिकांना नाव, पत्ता आणि मोबाईल नंबर अपडेट करण्यापासून ते QR आधारित पडताळणी आणि फेस व्हेरिफिकेशनदेखील करता येणार आहे. एवढेच नाही तर नवीन ॲप पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित असल्याचे म्हटले जात आहे.

नवीन आधार ॲपमध्ये नोंदणी कशी करावी

स्टेप १ : नवीन आधार ॲपमध्ये नोंदणी करण्यासाठी गुगल प्ले स्टोअर किंवा ज्यांचा ॲपल मोबाईल असल्यास ॲपल ॲप स्टोअरमध्ये UIDAIच्या अधिकृत वेबसाइटवरून अधिकृत "आधार" ॲप डाउनलोड करा. त्यानंतर तुम्हाला भाषा निवडण्यासाठी पर्याय येईल, यामध्ये तुम्हाला तुमच्या आवडीची भाषा निवडायची आहे आणि 'Continue'वर टॅप करा..


स्टेप २ : पुढे तुम्हाला १२ अंकी आधार नंबर टाकायचा आहे, यासाठी तुम्हाला तुमच्या आधार कार्डला मोबाईल क्रमांक आधारशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्यानंतर तुमच्या आधार नंबरशी जोडलेला मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी पाठवला जाईल, तो तेथे व्हेरिफाय करा तर काही नागरिकांना फेस ऑथेंटिकेशन करण्याची देखील आवश्यकता असू शकते. यासाठी तुम्हाला तुमचा कॅमेरा दाखवावा लागेल आणि स्क्रीनवरील काही सूचना दिल्या जातील त्याचे पालन करावे लागणार आहे.

स्टेप ३ – पुढे या प्रक्रियेमध्ये MPIN नंबर सेट करावा लागणार आहे, हा तुमचा लॉगिन पासकोड असणार आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर, तुमचे आधार प्रोफाइल ॲपमध्ये जोडले जाईल. आता तुम्ही डिजिटल आधार, QR शेअरिंग आणि इतर सेवा वापरू शकता.

नवीन ॲपमध्ये कसे लॉगिन करायचे?

पहिली स्टेप – ॲपमध्ये नोंदणी केल्यानंतर तुम्ही जेव्हा ॲप उघडाल तेव्हा सर्वात आधी MPIN नंबर टाका. तर तुम्ही पासवर्ड विसरला असाल तर मग Forgot MPINचा पर्याय आहे. नवीन ॲपमध्ये लॉगिन करण्यासाठी फेस ऑथेंटिकेशन, ओटीपी आणि एमपिन ऑप्शन आहेत.

# चित्रकार सावळाराम हळदणकर



## निमित्त

महाराष्ट्रातील प्रख्यात चित्रकार सावळाराम लक्ष्मण हळदणकर यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया या लेखातून त्यांच्याविषयी... सावळाराम लक्ष्मण हळदणकर यांचा जन्म २५ नोव्हेंबर १८८२ रोजी सावंतवाडी येथे झाला. सावंतवाडी येथील विद्यार्थिदशेतच त्यांनी चित्रकलेतील ग्रेड (श्रेणी) परीक्षेतही विशेष नैपुण्य संपादन केले. चित्रकलेच्या पुढील शिक्षणासाठी १९०३ मध्ये ते मुंबईला गेले आणि त्यांनी तेथील सर जे. जे. स्कूल ऑफआर्टमध्ये कलाशिक्षणासाठी रीतसर प्रवेश घेतला. तेथे त्यांना अनेक मातब्बर ज्येष्ठ कला–शिक्षकांचे व चित्रकारांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

विद्यार्थी–दशेपासूनच त्यांना चित्रकलेचीअनेक पारितोषिके मिळत गेलीआणि १९०७पासून चित्रकार म्हणून त्यांचा नावलौकिक झाला. मुंबई, मद्रास (चेन्नई), कलकत्ता (कोलकाता), सिमला, अमृतसर, म्हैसूर येथील प्रदर्शने, तसेच दिल्ली येथील ऑल इंडिया फाइन आर्ट्सअँड क्राफ्ट सोसायटीची प्रदर्शने अशा सर्व ठिकाणी त्यांची चित्रे झळकू लागली व अनेक चित्रांना मानाची पारितोषिकेही मिळाली. त्यांनी १९०६पासून १९५८पर्यंत मुंबईतील बॉम्बे आर्ट सोसायटी व आर्ट सोसायटीऑफ इंडिया यांच्या प्रदर्शनांत सातत्याने चित्रे पाठवली. त्यांनी नवोदित चित्रकारांना प्रशिक्षण देण्यासाठी १९०८मध्ये दादर येथे चित्रकला वर्ग सुरू केला. पुढे त्याचाच विस्तार होऊन १९४०मध्ये गिरगाव येथे 'हळदणकर फाइन आर्ट इन्स्टिट्यूट' ही संस्था स्थापन झाली. नव्या पिढीतील चित्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच प्रदर्शनादी विविध उपक्रम राब–विण्यासाठी त्यांनी काही स्नेह्यांच्या सहकार्याने 'आर्ट सोसायटी ऑफइंडिया' ही संस्था १९१८मध्ये स्थापन केली. आजही ही संस्था उत्तमकार्य करीत आहे. १९२५मध्ये त्यांना त्यांच्या मॉहमेडन पिलग्रिम या कॅन्व्हासवरील तैलरंगातील फकिराच्या चित्राला बॉम्बे आर्ट सोसायटीचे सुवर्णपदक मिळाले. त्यांच्या निर्मितीत प्रामुख्याने व्यक्तिचित्रे, निसर्गचित्रे व पौराणिक विषयांवरील प्रसंगचित्रे यांचा समावेश होतो. जलरंग व तैलरंगया दोन्ही माध्यमांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांतील तंत्रविशिष्ट बारकावेत्यांनी विलक्षण कौशल्याने आपल्या चित्रांतून दर्शविले पण त्यांनी शुद्ध पारदर्शक जलरंगांत रंगविलेली चित्रे त्यांतील अप्रतिम तंत्रकौशल्यासाठी देश–विदेशात वाखाणली गेली. चित्रांत साधलेले छायाप्रकाशाचे परिणाम, चित्रणासाठी वापरलेल्या कमी–अधिक जाडीच्या रंगछटा व रंगलेपनाचे कौशल्य ही त्यांची शैलीवैशिष्ट्ये जलरंग व तैलरंग या दोन्ही माध्यमांत जाणवतात. त्यांच्या अ पायस लाइफ (१९३५), ग्लो ऑफ होप (जलरंग, १९३६), पोर्ट्रेट ऑफ मिसेस डेव्हिस (जलरंग, १९३९ पहा : मराठी विश्वकोश, खंड ६, चित्रपत्र ४४), फकिरीतील अमिरी (१९४०), डिव्हाइन फ्लेम (जलरंग, १९४५), निरांजनी (कागदावर जलरंग, १९५२), स्वातमानंद स्वामी (१९५३–५४) इ. चित्रांपैकी ग्लो ऑफ होप हे चित्र सर्वाधिक गाजले. त्यांनी रंगवलेल्या पं. मदनमोहन मालवीय यांच्या व्यक्तिचित्राचा राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याकडून खास गौरव करण्यात आला (१९६४). दिल्ली येथील ललित कला अकादमीतर्फे १९६२मध्ये त्यांना अधिछात्रवृत्ती देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट कलाशिक्षक व शास्त्रीय संगीताचे दर्दी जाणकार म्हणूनही त्यांचे ख्याती होती. मुंबई येथे त्यांचे ३० मे १९६८ रोजी निधन झाले.

**–श्री.दे. इनामदार**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### उन्हाळ्यात या तीन गोष्टींनी मिळेल नैसर्गिक थंडावा

उन्हाळ्याचा कडाका सध्या इतका वाढलाय की घराबाहेर पडणंही कठीण झालं आहे. एसी आणि कुलर लावूनही अंगाची लाहीलाही थांबत नाहीये. अशा वेळी महागड्या गॅजेट्सवर अवलंबून राहण्यापेक्षा आपल्या पूर्वजांनी सांगितलेले काही 'देशी जुगाड' खरोखरच वरदान ठरू शकतात. प्रसिद्ध आहारतज्ज्ञ ऋजुता दिवेकर यांनी उन्हाळ्याच्या या भीषण लाटेत शरीराला नैसर्गिकरित्या आतून थंड ठेवण्यासाठी तीन अत्यंत सोपे आणि प्रभावी उपाय शेअर केले आहेत. विशेष म्हणजे यासाठी तुम्हाला ना विजेची गरज आहे, ना महागड्या तंत्रज्ञानाची!



उन्हाळ्यात साधे पाणी पिणे अनेकदा नकोसे वाटते, अशा वेळी पाण्याचा माठ किंवा बाटलीत दोन–तीन वाळ्याची मुळे टाकणे हा एक उत्तम पर्याय आहे. ऋजुता दिवेकर याला भारताचे हक्काचे इन्फ्युज्ड वॉटर मानतात. यामुळे पाण्याला केवळ नैसर्गिक गोडवाच येत नाही, तर शरीराला आवश्यक असलेला थंडावा मिळतो.

वाळ्याचे फायदे केवळ तहान भागवण्यापुरते मर्यादित नाहीत. उन्हाळ्यामुळे होणारी डोकेदुखी, चेहऱ्यावरील पिंपल्स किंवा केसातील कोंडा यांसारख्या समस्यांवरही वाळा गुणकारी ठरतो. जुन्या काळात वाळ्यापासून बनवलेले हातपंखे आणि पडदे वापरले जात असत, ज्याचा आधार आजही अनेक ठिकाणी कुलरमध्ये थंडाव्यासाठी घेतला जातो.

लहानपणी हौसेने लावली जाणारी मेहंदी उन्हाळ्यातील उष्णता शोषून घेण्याचे एक उत्तम साधन आहे. हातावर मेहंदी लावल्याने शरीराचे तापमान नैसर्गिकरित्या कमी होण्यास मदत होते. ऋजुता दिवेकर यांच्या मते, मेहंदीचा सुगंध मन शांत करतो आणि ताणतणाव कमी करण्यासाठी औषधासारखा काम करतो. जर तुम्हाला उन्हामुळे अस्वस्थ किंवा चिडचिड होत असेल, तर मेहंदी लावल्याने तुम्हाला नक्कीच शांत वाटू शकते.

उन्हाळ्यात दररोजच्या जेवणात किमान दोन ते तीन वेळा ताकाचा समावेश करणे हे आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. ताकातून शरीराला प्रथिने, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन B१२ मिळते. ताक हे केवळ पचनासाठी चांगले नसून ते एक उत्तम प्रोबायोटिक, प्रीबायोटिक आणि पोस्टबायोटिक म्हणूनही काम करते.

उन्हामुळे शरीरातील पाण्याचे आणि क्षारांचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे थकवा जाणवतो. अशा वेळी ताकामध्ये थोडे मीठ, हिंग आणि जिरे पूड घालून प्यायल्याने पचन सुधारते, भूक वाढते आणि पोट फुगण्याचा त्रास कमी होतो.

# जलक्रीडा उपक्रमांना 'मान्सून ब्रेक'

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पावसाळी हंगामाची चाहूल लागताच रायगड किनारपट्टीवरील जलक्रीडा उपक्रमांना ब्रेक लागला आहे. प्रशासनाने 26 मेपासून समुद्रातील सर्व जलक्रीडा प्रकारांवर बंदी लागू केल्यानंतर अलिबाग परिसरातील समुद्रकिनाऱ्यांवर जलक्रीडा व्यावसायिकांची मोठी लगबग सुरू झाली आहे. क्रेनच्या सहाय्याने बोटी समुद्रातून बाहेर काढून सुरक्षित स्थळी हलविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे चित्र किनारपट्टीवर पाहायला मिळत आहे.



अलिबाग, किहीम, नागाव, मांडवा, वरसोली आदी समुद्रकिनाऱ्यांवर जेट स्की, बनाना राइड, बंपर राइड, स्पीड बोट, पॅरासेलिंग यांसारख्या जलक्रीडा प्रकारांना वर्षभर पर्यटकांची मोठी पसंती असते. विशेषतः उन्हाळी सुट्ट्यांमध्ये हजारो पर्यटक समुद्र सफरीचा आणि साहसी खेळांचा आनंद घेण्यासाठी अलिबागकडे धाव घेतात. मात्र, मान्सून काळात समुद्र अधिक खवळलेला असतो. भरती–ओहोटीचा वाढलेला वेग, जोरदार वारे, मुसळधार पाऊस आणि समुद्रातील अनिश्चित प्रवाह यामुळे अपघाताचा धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत प्रशासनाने दरवर्षीप्रमाणे यंदाही जलक्रीडांवर तात्पुरती बंदी लागू केली आहे.


बंदी लागू होताच जलक्रीडा व्यावसायिकांनी आपल्या बोटी, जेट स्की आणि अन्य साहित्य सुरक्षित करण्यासाठी हालचाली वेगाने सुरू केल्या आहेत. अनेक किनाऱ्यांवर मोठ्या क्रेनच्या सहाय्याने स्पीडबोट आणि जेट स्की समुद्रातून बाहेर काढून वाळूत किंवा सुरक्षित गोदामांमध्ये ठेवण्यात येत आहेत. काही ठिकाणी बोटींची दुरुस्ती, रंगकाम आणि देखभालही सुरू करण्यात आली आहे. दिवसभर कामगार या कामात व्यस्त असल्याचे चित्र किनारपट्टीवर दिसून येत आहे.

दरम्यान, जलवाहतूक आणि जलक्रीडा व्यवसायावर अवलंबून असलेल्या व्यावसायिकांसाठी पावसाळी बंदीचा काळ आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक मानला जातो. चार महिन्यांसाठी व्यवसाय बंद राहिल्याने उत्पन्नाचे प्रमुख साधन थांबते. तरीदेखील सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय आवश्यक असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. पर्यटकांचा जीव सर्वात महत्त्वाचा आहे. पावसाळ्यात समुद्राचा अंदाज घेणे कठीण असते. त्यामुळे प्रशासनाच्या नियमांचे पालन करून आम्ही बोटी सुरक्षित स्थळी हलवत आहोत, अशी प्रतिक्रिया एका जलक्रीडा व्यावसायिकाने दिली.

# तळा येथे रस्ता मध्येच खोदल्याने मार्ग बंद; शेतकऱ्यांसह नागरिकांतून संताप

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरासाठी १३ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेचे काम चालू असून ठेकेदाराने वावेहवेली ते बामणघर तळा रस्त्यावर रस्त्याच्या मधूनच पाइपलाईन टाकण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यामुळे शेतकरीवर्ग व नागरिकांना मनस्ताप होत असून शेतकरी वर्गातून संतप्त प्रतिक्रिया उमटतांना दिसत आहे.हा रस्ता खोदकाम केल्यामुळे बंद झाल्याने सदर ठेकेदाराला नागरिकांची व शेतकऱ्यांची कदरच नसल्याचे यातून समोर येत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.



या रस्त्याच्या मधूनच पाईपलाईन टाकण्यासाठी खोदकाम केलेले आहे.या मध्ये पाईपलाईन टाकली असून सदर पाईप लाईन ही रस्त्याच्या मधूनच टाकण्या ऐवजी रस्त्याच्या कडेने टाकावी अशी सदर ठेकेदाराला सूचीत केले आहे तसेच पश्चात जरका पाईपलाईन लीक झाली तर मोठा प्रवाह फोर्सने पाणी बाहेर पडून रस्ता वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही यामुळे ग्रामस्थांनी रस्त्याच्या बाजूने पाईपलाईन टाकावी अशी विनंती केली आहे.व सदर रस्ता पुन्हा जाण्या येण्याच्या दृष्टीने भर टाकून पुर्ववत करावा असे तीन दिवसा पुर्वी सांगितले आहे परंतु अद्यापही हा रस्ता तसाच खोदकाम केलेला आहे.हे काम करताना


वावेहवेली येथील कोणत्याही ग्रामस्थाला विचारात न घेताच ठेकेदाराने हे काम केले आहे.हे बरोबर नाही असा प्रश्न समोर येत आहे. सध्या मान्सूनपुर्व पावसाची शेतकऱ्यांची कामे चालू असून या मार्गावरून शेतावर साहित्य घेऊन जाणे,तसेच तळा बाजारात वावेहवेली येथील नागरिक सतत ये जा करत असतात व बामणघर गौळवाडी येथील ही शेतकरी व नागरिक शेतीची कामे व इतर कामे करण्यासाठी या मार्गाचा वापर करत असतात.या रस्त्यावरून कोणतेही वाहन नेणे शक्य नाही.तसेच रात्रीच्या वेळी जर का एखादे वाहन आले तर मोठा धोका निर्माण होऊन अपघात होण्याचा धोका आहे.तसेच एखादा माणूस आजारी पडला तर त्यास डॉक्टर कडे कसे न्यावे हाही गंभीर प्रश्न उपस्थित राहू शकतो.

ठेकेदाराने रस्त्यावर खोदलेला खड्डा भरून काम पुर्ण करावे व पाईपलाईन रस्त्याच्या कडेने घेण्यात यावी अशी संतप्त मागणी वावेहवेली गावच्या नागरिकांतून होताना दिसत आहे.सदर बाबतीत नागरिकांमधून बोलले जात आहे की रस्त्याच्या मधूनच पाईपलाईन टाकण्याचे व त्यासाठी खोदकाम करण्यासाठी सदर ज्या विभागाच्या ताब्यात रस्ता आहे त्या विभागाची तरी परवानगी घेतली होती का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.तसेच परिसरातील नागरिकांशी का संवाद साधला गेला नाही असेही बोलले जात आहे.ही बाब गंभीर असल्याचे दिसत आहे.

# नेरळमध्ये भटक्या कुत्र्यांचा पुन्हा हल्ला; वृद्धाच्या पायाला चावा

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ येथील वाल्मिकी नगर परिसरात आज सकाळच्या सुमारास एका वयोवृद्ध व्यक्तीवर भटक्या कुत्र्याने हल्ला करून त्यांच्या पायाला चावा घेतल्याची घटना घडली. आपल्या मुलीकडे भेटण्यासाठी आलेल्या या व्यक्तीवर पाठीमागून आलेल्या भटक्या कुत्र्याने अचानक झडप घालत चावा घेतल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्ती हे कळंबजवळील ओलमन येथील आदिवासी वाडीतील रहिवासी असून ते मुलीकडे कोमलवाडी येथे आले होते. अचानक झालेल्या या हल्ल्यानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमी वृद्धाला प्राथमिक उपचार करून नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी पाठवले. सदर व्यक्तीचे नाव रमेश असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच कर्जत शहरात एका सहा वर्षांच्या चिमुकल्याला भटक्या कुत्र्याने चावा घेतल्याची घटना सीसीटीव्हीमधून समोर आली होती. त्यानंतर आता नेरळमध्येही अशाच प्रकारची घटना घडल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

नेरळ परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सातत्याने अशा घटना घडत असतानाही ग्रामपंचायत प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शेलू–नेरळदरम्यान डेक्कन एक्सप्रेस बंद पडली; सव्वा तास रेल्वे वाहतूक विस्कळीत

**नेरळ : प्रतिनिधी**

शेलू आणि नेरळ रेल्वे स्थानकांदरम्यान डाऊन (पुणे) मार्गावर धावणारी डेक्कन एक्सप्रेस 29 मे शुक्रवारी आज सकाळी तांत्रिक बिघाडामुळे अचानक बंद पडल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली. सकाळी 8 वाजून 45 मिनिटांच्या सुमारास दामत गेट परिसरात इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ही एक्सप्रेस थांबली होती.



या घटनेमुळे पुणे दिशेकडे जाणाऱ्या अनेक एक्सप्रेस गाड्या तसेच मुंबईकडे येणाऱ्या रेल्वे सेवेवर परिणाम झाला. उद्यान एक्सप्रेससह कर्जत लोकल वांगणी रेल्वे स्थानकात खोळंबून राहिल्या. तर कर्जत–खोपोली लोकल सेवा बदलापूर रेल्वे स्थानकातूनच सीएसएमटीकडे वळवण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.यामुळे कर्जत आणि खोपोली जाणाऱ्या प्रवाशांचे हाल झाले.

# आमणोली–कोलाथरे धोकादायक लोखंडी पूल बनलाय मृत्यूचा सापळा, दुर्घटनेची भीती

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या सुधागड तालुक्यातील आमणोली–कोलाथरे मार्गावरील लोखंडी पूल सध्या अत्यंत जीर्ण, कमकुवत आणि धोकादायक अवस्थेत असून, कोणत्याही क्षणी पूल कोसळून मोठी दुर्घटना घडून जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक गावांना जोडणारा व जीवन वाहिनी म्हणून उपयुक्त असणाऱ्या या पुलाची लोखंडी संरचना अनेक ठिकाणी गंजून कमकुवत झालीये , तर पुलावर मोठे खड्डे व तडे पडले आहेत. या पुलावरून चालताना पूल अक्षरशः हलत असल्याने मनात भीती घेऊन नागरिक जीवघेणा प्रवास करीत आहेत. त्यामुळे या पुलावरून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. आमणोली–कोलाथरे धोकादायक लोखंडी पुल मृत्यूचा सापळा बनला असून नागरिकांचा जिव टांगणीला लागला आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन अटळ असल्याचा इशारा देण्यात आला आहे.



विशेष म्हणजे काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपला असताना प्रशासन मात्र अद्यापही गंभीरपणे दखल घेत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे. पावसाळ्यात पुलाखालील पाण्याचा वेग वाढल्यास हा पूल कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी तसेच नोकरदार वर्गाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या मार्गाला कोणताही पर्यायी रस्ता नसल्याने नागरिकांना नाईलाजास्तव याच धोकादायक पुलाचा वापर करावा लागत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाच्या दुरवस्थेबाबत अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी, निवेदने आणि मागण्या करण्यात आल्या. मात्र अधिकारी केवळ पाहणी आणि आश्वासनांपुरतेच मर्यादित राहिले असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

"दुर्घटना घडल्यानंतर पंचनामे आणि मदतीच्या घोषणा करण्यापेक्षा आताच आणि भरभक्कम पूल बांधा," अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधींनीही केवळ आश्वासनांची खैरात न करता तातडीने निधी मंजूर करून नवीन व मजबूत पूल उभारावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# मोग्रज नळपाणी योजनेच्या कामाला गती, जुने जलकुंभ पाडले

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायत साठी राबविण्यात येत असलेल्या नळपाणी योजनेच्या कामाला गती देण्यात आली आहे. जलजीवन मिशन मधून राबविण्यात येत असलेल्या नळपाणी योजनेचे कामे निधी अभावी रखडली होती मात्र मोग्रज नळपाणी योजनेसाठी निधी मिळाला असून या योजनेच्या जुन्या जलकुंभाच्या जागी नवीन जलकुंभ बांधण्यास सुरुवात झाली आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरण कडून नळपाणी योजना राबविण्यात येत आहे. मोग्रज ग्रामपंचायत हद्दीतील गावांसाठी ही नळपाणी योजना जलजीवन मिशन मधून राबविली जात आहे. ही नळपाणी योजना प्रगतीपथावर असून जॅकवेल येथे 50 एचपीचे दोन पंप बसविण्यास सुरुवात केली आहे. कोटींबे येथून क्रॉसिंग चे काम सुद्धा सुरू आहे. पाणी उचलण्याच्या पंपासाठी लागणारी विद्युत यंत्रणा यासाठी महावितरण कडील सर्व कार्यवाही पूर्णभकरण्यात आली आहे. त्यामुळे या नळपाणी योजनेच्या कामाला गती मिळाली आहे. दुसरीकडे या गावातील जुन्या नळपाणी योजनेचे जलकुंभ पाडून टाकण्यात आले आहे. जून्या जलकुंभाच्या जागी नवीन जलकुंभ बांधण्यासाठी सुरुवात देखील झाली आहे. या नळपाणी योजनेत एकूण 11 पाण्याचे जलकुंभ असून यापैकी दोन जलकुंभांची कामे पूर्ण झाली आहेत.



# चौक ग्रामपंचायतीने पावसाळापूर्व कामे केली सुरू; ग्रामस्थांना दिलासा

**चौक : प्रतिनिधी**

पावसाळ्यात कोणतीही आपत्ती येऊ नये, गटारे तुंबून नये, विद्युत पुरवठा खंडित होऊ नये म्हणून ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी पावसाळ्या पूर्वीची कामे सुरू केली आहेत.



ग्रुप ग्रामपंचायत चौक हद्दीतील जनजीवन सुरळीत राहावे आणि कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी पावसाळ्यापूर्वी रस्ते दुरुस्ती, गटारे व सांडपाण्याची स्वच्छता,धोकादायक झाडांची छाटणी, आणि पिण्याच्या पाण्याच्या शुद्धतेची काळजी घेणे यांसारखी महत्त्वाची कामे ग्राम पंचायत चौक यांनी सुरू केली.प्रत्यक गावपातळीवर ग्रामपंचायतीमार्फत कामे केली जात आहेत.

स्वच्छता आणि डास निर्मूलन, गावातील सांडपाण्याची गटारे आणि नाले पूर्णपणे साफ करण्याचे काम सुरू आहे, पावसात पाणी तुंबणार नाही. डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी औषध फवारणी देखील करण्यात येणार आहे.पिण्याच्या पाण्याची विहिरी आणि बोअरवेलमधील पाणी शुद्ध राहण्यासाठी (ब्लिचींग पावडर आणि जंतुनाशके टाकणे) आणि पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनमध्ये गळती काढण्याचे काम होत आहे.

गावातील वीज तारांवर किंवा रहिवासी घरांवर पडू शकतील अशा धोकादायक फांद्या विद्युत मंडळाच्या माध्यमातून कापल्या जात आहेत. धोकादायक ठिकाणी असलेल्या विद्युत तारा व डी.पी. (DP) यांची दुरुस्ती करण्यासाठी विद्युत मंडळाला पत्र देण्यात आल्याचे सांगण्यात आले. सरपंच रितू ठोंबरे, उप सरपंच पूजा हातमोडे, ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे,सदस्य आणि ग्राम पंचायत कर्मचारी यांनी या कामात सक्रिय सहभाग घेतला आहे.




**मुरुड : येथील जंजिरा किल्ला अणि ढगांच्या छटा टिपण्यासाठी मुंबईचे पीएसआय या शंभर वर्ष जुन्या संस्थेचे सदस्य वैभव जागुस्टे, राजेंद्र वाघमारे, गोल्ड मेडलिस्ट सौरभ भट्टाचार्य अशा १८ जणांनी सैर केली.** (छाया : सुधीर नाझरे)

# चौलच्या इतिहासाचे साक्षीदार मल्लेश्वर मंदिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलचे प्राचिनत्व इ.स. पुर्व १२०० पर्यंत नेता येते. प्राचीन इतिहास असलेल्या या नगरीत पुरातनकाळात 'चौल चंपावती नगरी" या नावाने संबोधले जात असे.

प्राचीन काळात चौल व रेवदंडा या दोन्ही वैभवशाली शहरांना अन्यसाधारण महत्व असून ,येथून समुद्रमार्गे देशीविदेशी व्यापार होत असे, दोन्ही ठिकाणे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र व प्रसिध्द बंदरे होती. शिवकाळात रेवदंडा पोर्तुगिजाचे वर्चस्वाखाली होते, येथे पोर्तुगिजानी आगरकोट किल्ला बांधला. पोर्तुगिजाच्या अंमलाखाली असलेल्या रेवदंडा विभागाला लोअर चौल तसेच चौल मध्ये सन १६८३ मध्ये संभाजी महाराजानी राजकोट किल्ला बांधला असा लिखीत उल्लेख सापडतो, मात्र राजकोट किल्ला व चौलवर नेहमीच मुघलाचे वर्चस्व राहून या भागाला नेहमी अप्पर चौल संबोधले जात असे. प्राचीन चौल चंपावतीनगरीचे शिवकाळात अप्पर चौल व लोअर चौल असे दोन भाग पडले गेले.



प्राचीन काळी या चंपावतीनगरीत १६०००० इमारती, तसेच ३६० मंदिरे व ३६० तलाव असल्याचे लिखित आहे, तर चौल भोर्सी,पेठ, गडगा, नवेदरपेठ,मळा, आदी१६ पाखाडयात विभागलेले हे नगर होते. मुघल अमदानीत चौल मधील असंख्य प्राचीन, जागृत व भाविकांची श्रध्दास्थान असलेले अनेक प्रसिध्द मंदिरे उध्वस्त करण्यात आली. चौल चंपावती देवी मंदिरानजीकच इतिहासकाळाचे साक्षीदार असलेले चौलचे भाविकांचे श्रध्दा व भक्तीचे स्थान प्रसिध्द जागृत श्री मल्लेश्वर मंदिर आजही पहाण्यास मिळते.

चौलचौकी ते रेवदंडा बायपास या रस्त्याला मोडकआळी नजीक श्री मल्लेश्वर मंदिर आहे, इतिहासकाळाचे साक्षीदार असलेले हे श्री शंकराचे मंदिर एक जागृत देवस्थान म्हणून पुर्वीपासून प्रसिध्दीस आहे. नारळ पोफळीच्या गर्द छायेत हे श्री शंकराचे मंदिर मुख्यःरस्त्यालगत असल्याने नजरेत भरते, जुन्याकाळातील चौपाखी कौलारू व साधे बांधकामाचे श्री मल्लेश्वराचे मंदिर दुरूनच विलोभनिय वाटते, या मंदिराकडे पहाताच शांत, समाधानाची एक आगळीकता दृष्टीक्षेपात मिळते. या मंदिराचे प्रांगण म्हणजे एक भले मोठे पटागंण आहे. या भलेमोठे पटागंणात श्री मल्लेश्वरांची येथे उत्सव व जत्रेंचे आयोजन केले जात असावे असा कयास केला जातो. मंदिराचे समोरच सर्वसाधारण उंचीचे दोन दगडी दिपस्तंभ आहेत. या मंदिराच्या पटागंणाच्या लगतच समोरील बागायती लगतच दगडी बांधीव पुष्करणी आहे पुर्वी ही पुष्करणी बागायतीच्या आत मध्ये होती. श्री मल्लेश्वर मंदिराचे समोरील दोन दगडी दिपस्तंभाच्या मधूनच मंदिराच्या प्रवेशव्दाराकडे जाता येते, जुन्या पध्दतीच्या बांधकामाचे मंदिरातील आतील सभागृहात लाकडी नक्षीकाम पहाण्यासारखे आहे. मंदिराच्या प्रशस्त सभागृहात अस्सल दगडी नंदीची मुर्ती आहे, या नंदीदेवतेस नमन करून मंदिराच्या गाभाऱ्याकडे जाता येते. अंदाजे पाच ते आठ फुट लांबी रूंदीच्या गाभाऱ्यात श्री शंकराची विलोभनिय पिंडी भाविकाला आपोआप नतमस्तक व्हायला लावते, मंदिराच्या गाभाऱ्यात श्री शंभो सुमधूर आवाजाचा नाद मनाल वेगळीच शांती व समाधान देते. भाविकांच्या मनात श्री शंकराचा भक्तीचा मळा आपोआप फुलू लागतो. गाभाऱ्यांच्या भोवती भाविकांना श्री शंकराच्या पिंडी भोवती फेऱ्या मारण्यासाठी जागा सोडण्यात आली आहे. गाभाऱ्यांच्या उजव्या बाजूस दगडी आकाराच्या दोन मुर्ती आहेत, तेथून नतमस्तक भाविक काही वेळ मंदिराच्या सभागृहात बसून भक्तीभावाने श्री शंकराचे नामस्मरण करतो.

# नवी मुंबईतील पिण्याचे पाणी सुरक्षित असल्याचा महानगरपालिकेचा दावा

## ६६३ जल नमुन्यांची तपासणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर नवी मुंबई महानगरपालिकेने गुरुवारी विशेष पाणी गुणवत्ता तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत शहरभरातून तब्बल ६६३ पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून, सर्व नमुने भारतीय मानक ब्युरो (BIS) आणि केंद्रीय सार्वजनिक आरोग्य व पर्यावरण अभियांत्रिकी संघटना (CPHEEO) यांच्या निर्धारित निकषांनुसार योग्य आढळल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

महापौर सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली. अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा विभाग, मोरबे विभाग, संबंधित विभागीय अधिकारी तसेच



पाणीपुरवठा व्यवस्थेचे कंत्राटदार यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

शहरातील भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रापासून बेलापूर ते दिघा या विभागांपर्यंतच्या मुख्य जलवाहिन्यांवर आणि विविध नोड्समध्ये प्रत्यक्ष पाहणी करून नमुने गोळा करण्यात आले. भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातून ७२ नमुने, मुख्य जलवाहिन्यांमधून ९६ नमुने तर बेलापूर, नेरुळ, तुर्भे, वाशी, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली आणि दिघा या विभागांतून ४९५ नमुने तपासण्यात आले. तपासणीदरम्यान पाण्याचे pH मूल्य, एकूण विरघळलेले घटक (TDS), अवशिष्ट क्लोरीन आणि गढूळपणा या घटकांची तपासणी करण्यात आली. पाणी शुद्धीकरण प्रक्रियेनंतर नागरिकांपर्यंत पोहोचणाऱ्या पाण्याची गुणवत्ता मानकांनुसार असल्याचे निष्कर्ष तपासणीतून समोर आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून शहरातील काही भागांमध्ये पाण्याला दुर्गंधी येणे, गढूळ पाणीपुरवठा होणे किंवा पाण्याच्या रंगात बदल दिसून येणे अशा तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने ही विशेष मोहीम राबवून विविध स्तरांवर पाणी गुणवत्तेची पडताळणी केली आहे. या मोहिमेमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली शंका दूर करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

**पाणी तपासणी मोहिमेतील आकडे**

भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र : ७२ नमुने
मुख्य जलवाहिन्या : ९६ नमुने
शहरातील विविध नोड्स : ४९५ नमुने
एकूण तपासणी : ६६३ नमुने

महापालिकेने नागरिकांना सध्या शहरात स्वच्छ व पिण्यायोग्य पाणीपुरवठा सुरू असल्याचे सांगितले असून, पाणी गुणवत्तेबाबत नियमित तपासणी सुरू ठेवण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच पाणीपुरवठ्याबाबत कोणतीही तक्रार असल्यास संबंधित विभाग कार्यालयाशी किंवा महापालिकेच्या १८००२२२३०९ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अतिक्रमण, अवैध राडारोड्यावर सिडकोची धडक कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील बेलापूर, ऐरोली आणि खारघर परिसरात सिडको महामंडळाने धडक कारवाई करत अनधिकृत बांधकामे, झोपड्या आणि कमर्शियल स्टॉल्स हटवले असून अवैध डेब्रीज टाकणाऱ्या डंपरवर गुन्हे दाखल केले आहेत

नवी मुंबई नवी मुंबईतील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि अवैध राडारोडा टाकण्याच्या प्रकारांविरोधात सिडको महामंडळाने धडक कारवाई सुरूच ठेवली असून २५ व २६ मे रोजी विविध भागांत मोठी मोहीम राबविण्यात आली. बेलापूर, ऐरोली आणि खारघर येथे अनधिकृत बांधकामे व झोपड्या हटविण्याची कारवाई करण्यात आली, तर दुसरीकडे सिडकोच्या दक्षता विभागाच्या भरारी पथकाने तीन वेगवेगळ्या ठिकाणी अवैध राडारोडा टाकणारे तीन डंपर पकडून चालकांविरोधात तीन



पोलीस ठाण्यांत फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.

सिडकोच्या अनधिकृत बांधकामे विभागाने २६ मे रोजी बेलापूर नोडमध्ये सेक्टर १९/२० मधील भूखंड क्रमांक एनए-११९, एनए-१२१, एनए-१३० आणि एनए-१३१ येथील सिडकोच्या अधिसूचित जागेवर सुरू असलेली आरसीसी प्लिंथ स्वरूपातील अनधिकृत बांधकामे हटविली. या कारवाईसाठी पोकलेन, जीप आणि कामगारांची मदत घेण्यात आली.ऐरोली नोडमध्येही त्याच दिवशी मोठी कारवाई करण्यात आली. सेक्टर १ मधील सर्व्हे क्रमांक २६८ ते २७१ या संपादित जागेवरील तळमजल्याच्या अनधिकृत बांधकामाचे नऊ स्लॅब ब्रेकरच्या सहाय्याने पाडण्यात आले. या मोहिमेत अतिक्रमण विभाग, पोलीस, महावितरण आणि सुरक्षा यंत्रणांचा सहभाग होता.खारघरमध्ये सेक्टर ८ आणि ११ मधील सुमारे ६ हजार चौरस मीटर क्षेत्रावरील ११५ झोपड्यांचे बांधकाम जमीनदोस्त करण्यात आल्या.

तसेच सेक्टर ३६ मधील एका भूखंडावरील पत्र्याचे अनधिकृत कुंपण आणि १२ व्यावसायिक स्टॉलही हटविण्यात आले.२५ मे रोजी सिडकोच्या भरारी पथकाने पनवेल, खारघर आणि न्हावा परिसरात अवैधरीत्या राडारोडा (डेब्रीज) टाकणाऱ्या तीन डंपरवर कारवाई केली. संबंधित डंपर चालकांकडून सिडकोच्या जागांवर परवानगीशिवाय राडारोडा टाकला जात असल्याचे आढळून आले.

# फ्लेमिंगो क्षेत्रात ड्रोन कॅमेऱ्यांचा धुमाकूळ; पक्ष्यांसमोर नवे संकट, कारवाईची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**


नेरुळ येथील एनआरआय जलक्षेत्रात यंदाच्या हंगामात मोठ्या संख्येने दाखल होणाऱ्या स्थलांतरित गुलाबी फ्लेमिंगो पक्ष्यांसमोर आता नव्या धोक्याचे संकट उभे राहिले असल्याचा इशारा पर्यावरणप्रेमींनी दिला आहे.

फ्लेमिंगोंच्या अधिवास परिसरात आणि त्यावरून वाढत्या प्रमाणात ड्रोन उडवले जात असल्याने गंभीर चिंता व्यक्त होत आहे. सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असलेल्या व्हिडिओंमध्ये कमी उंचीवरून ड्रोनद्वारे फ्लेमिंगोंचे अगदी जवळून चित्रीकरण होताना दिसत आहे.

पर्यावरणप्रेमींनी निदर्शनास आणून दिले की, यंदा फ्लेमिंगो पक्ष्यांचे आगमन नेहमीपेक्षा उशिरा झाले असून डीपीएस फ्लेमिंगो लेक आणि टीएस चाणक्य जलक्षेत्र पक्ष्यांसाठी अधिकाधिक प्रतिकूल बनल्याने सध्या हे पक्षी प्रामुख्याने एनआरआय जलक्षेत्रात एकवटले आहेत.

"अशातच काही अतिउत्साही छायाचित्रकार फ्लेमिंगोंच्या वरून ड्रोन उडवत आहेत, जे पक्ष्यांसाठी धोकादायक आहे," असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.

"वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत संरक्षित अधिवासांमध्ये वन्यजीवांना कोणताही त्रास देणे प्रतिबंधित आहे. संवेदनशील वन्यजीव क्षेत्रांमध्ये ड्रोन संचालन स्पष्टपणे निषिद्ध आहे," असे ते म्हणाले.



सोशल मीडियावर फ्लेमिंगो "नाचत" असल्याचे आणि उडताना दिसणारे ड्रोन-चित्रित व्हिडिओ मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असल्याबद्दल कुमार यांनी चिंता व्यक्त केली. "मनोरंजनासाठी पक्ष्यांना मुद्दाम घाबरवले जात असल्याचे यातून स्पष्ट होते," असे ते म्हणाले. त्यांनी वन विभाग आणि मँग्रोव्ह सेलने अधिक कठोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली.

वन विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, एनआरआय जलक्षेत्रात भेट देणाऱ्यांच्या पिशव्यांची तपासणी करण्यासाठी आणि ड्रोनवर लक्ष ठेवण्यासाठी रक्षक तैनात करण्यात आले आहेत. "गेल्या आठवड्यात एक ड्रोन जप्त करण्यात आला होता आणि संबंधित चालकाला इशारा देऊन सोडण्यात आले," असे त्यांनी सांगितले, मात्र यामुळे समस्या सुटलेली नाही, असे एका वन्यजीव छायाचित्रकाराने सांगितले. "जलक्षेत्रावर गुप्तपणे ड्रोन उडवण्याचे प्रकार अजूनही सुरूच आहेत."

पर्यावरणप्रेमींनी इशारा दिला की, खाद्य शोधताना किंवा विश्रांती घेताना फ्लेमिंगो पक्ष्यांना ड्रोनमुळे गंभीर त्रास होऊ शकतो. ड्रोनमधून निर्माण होणारा आवाज आणि अचानक होणारी हवाई हालचाल पक्ष्यांमध्ये घबराट निर्माण करू शकते. त्यामुळे त्यांना विनाकारण उड्डाण करावे लागते आणि त्यांची महत्त्वाची ऊर्जा खर्च होते.

"घाबरलेल्या अवस्थेत उडताना ड्रोनच्या पात्यांमुळे पक्षी जखमी होऊ शकतात किंवा मृत्युमुखीही पडू शकतात," असे कुमार यांनी सांगितले. टीएस चाणक्य परिसरातील फ्लेमिंगो अधिवासाजवळ वेब सिरीजच्या चित्रीकरणावेळी ड्रोन वापराबाबत आपण यापूर्वी मुख्यमंत्रीांकडे तक्रार केली होती, अशी आठवण त्यांनी करून दिली. त्या तक्रारीनंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची दखल घेत गृह विभागाला सतर्क केले होते.

स्वर्णसृष्टी हॅबिटॅट रिस्टोरर फाउंडेशनच्या संचालिका ज्योती नाडकर्णी यांनी सांगितले की, फ्लेमिंगो पक्ष्यांचा समावेश आययूसीएन (आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघटना) च्या 'निअर थ्रेटन्ड' अर्थात धोक्याच्या उंबरठ्यावर असलेल्या प्रजातींच्या यादीत करण्यात आला आहे.

"या स्थलांतरित पक्ष्यांचे संरक्षण करणे आणि त्यांना आणखी धोक्यात किंवा तणावाखाली न ढकलणे ही मानवाची जबाबदारी आहे," असे पक्षीनिरीक्षक ज्योती नाडकर्णी यांनी सांगितले.

पर्यावरणप्रेमींनी निदर्शनास आणून दिले की, फ्लेमिंगो अधिवासांमध्ये विनापरवानगी ड्रोन उडवणे हे वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील कलम २९, ३२ आणि ३३ अंतर्गत कारवाईस पात्र ठरू शकते. या कलमांनुसार वन्यजीवांना त्रास देणे, त्यांच्या अधिवासाचे नुकसान करणे तसेच संरक्षित आणि पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांतील हालचालींवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्रशासनाला देण्यात आले आहेत.

# एपीएमसीमध्ये मुखाच्या कर्करोगाचे ७५ संशयित रुग्ण

## माथाडी कामगार आणि व्यापाऱ्यांमध्ये तंबाखू, गुटखा सेवनाचे चिंताजनक प्रमाण

**नवी मुंबई :रामप्रहर वृत्त**

वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) परिसरात आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय मुख कर्करोग पूर्वतपासणी शिबिरात तपासणी करण्यात आलेल्या ३८९ जणांपैकी ७५ जणांमध्ये मुखाच्या कर्करोगाची लक्षणे आढळून आली. त्यापैकी २१ जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने 'बायोप्सी' चाचणीसाठी संदर्भित करण्यात आले. या आकडेवारीमुळे एपीएमसी परिसरात तंबाखू आणि गुटखा सेवनाचे वाढते प्रमाण पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पणन मंत्री जयकुमार



रावल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि एपीएमसी सचिव शरद जरे यांच्या पुढाकाराने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. टाटा मेमोरियल सेंटर आणि वर्ल्ड ॲग्रो केअर फाउंडेशन यांनी मसाला आणि फळ बाजारात ही तपासणी केली. तंबाखूमुळे होणाऱ्या गंभीर आजारांचे लवकर निदान आणि जनजागृती व्हावी हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

शिबिरातील निष्कर्षांवरून एपीएमसी परिसरात काम करणारे माथाडी कामगार, मापाडी, सफाई कर्मचारी आणि व्यापाऱ्यांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढल्याचे स्पष्ट झाले. मात्र, बाजार आवारातील मोठ्या गर्दीच्या तुलनेत तपासणी शिबिराला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याची खंत वैद्यकीय पथकाने व्यक्त केली. पानटपऱ्यांवर गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ खरेदीसाठी मोठ्या रांगा दिसत असताना आरोग्य तपासणीबाबत मात्र अनास्था दिसून आल्याचे निरीक्षण वैद्यकीय पथकाकडून व्यक्त करण्यात आले.

पीएमसीच्या पाच प्रमुख बाजार विभागांमध्ये शंभरहून अधिक पानटपऱ्या सुरू असून त्यापैकी अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याचा आरोप बाजार घटक करत आहेत.

> **माथाडी कामगार आणि इतर बाजार घटकांमध्ये तंबाखू सेवनाचे वाढते प्रमाण गंभीर बाब आहे. भविष्यात त्यांना कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा सामना करावा लागू नये म्हणून वेळीच निदान करण्यासाठी हे तपासणी शिबीर घेण्यात आले.**
>
> **-डॉ. अजय पाटील,** वैद्यकीय अधिकारी, मुंबई एपीएमसी

# नवी मुंबई प्रदर्शन केंद्रातील टर्फ, पीकबॉल कोर्ट हटवण्याचे सिडकोचे आदेश



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील शाळांच्या मैदानांवरील अतिक्रमण आणि व्यावसायिक वापराबाबत नोटिसा बजावलेल्या सिडकोने आता वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरच्या ( नवी मुंबई प्रदर्शन केंद्रातील) वाहनतळावर परवानगीविना उभारण्यात आलेल्या फुटबॉल टर्फ आणि पीक बॉल कोर्टाविरोधातही कारवाईची भूमिका घेतली आहे. शहरातील सार्वजनिक मैदाने आणि भूखंड मूळ उद्देशाप्रमाणेच वापरले जावेत, यासाठी सिडकोने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी रहिवाशांकडून होत असतानाच संबंधित संस्थेला तीन दिवसांत अनधिकृत बांधकाम हटविण्याची नोटीस बजावण्यात आली आहे.

सिडको महामंडळाने २२ मे रोजी 'एशियन कन्व्हेन्शन्स अँड एक्स्पोझिशन्स प्रा. लि.' या संस्थेला दिलेल्या नोटीसीमध्ये वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर संचालनासाठी संबंधित संस्थेशी ५ डिसेंबर २०१७ रोजी परवाना करार करण्यात आल्याची आठवण करून दिली. मात्र, या परवानाधारक जागेतील वाहनतळ क्षेत्रामध्ये सिडकोची पूर्वपरवानगी न घेता फुटबॉल टर्फ आणि पीकबॉल कोर्ट उभारण्यात आल्याचे सिडकोच्या निदर्शनास आल्याने ही नोटीस बजावत असल्याचे सिडकोने नोटीसीत म्हटले आहे.

तसेच वाहनतळाच्या जागेत करण्यात आलेले हे बांधकाम परवाना कराराच्या अटींचे उल्लंघन असून त्यामुळे संबंधित जागेवर भौतिक अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे हे बांधकाम बेकायदा ठरत असल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे. नोटीस मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत फुटबॉल टर्फ आणि पीकबॉल कोर्ट हटविण्याचे निर्देश देण्यात आले असून अन्यथा सिडकोकडून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशाराही संबंधित संस्थेला देण्यात आला आहे.

सिडकोने यापूर्वी नवी मुंबईतील १३ विविध शाळा व्यवस्थापनांना शाळांलगतच्या मैदानांवर विविध प्रकारचे अतिक्रमण आणि अनधिकृत वापर होत असल्याच्या कारणावरून नोटिसा बजावल्या होत्या. मात्र, ही कारवाई केवळ नोटिसांपुरती मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष अतिक्रमण हटवून मैदाने नागरिकांसाठी खुली करावीत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

गेल्या काही वर्षांत नवी मुंबईत मैदानांवर कृत्रिम टर्फ उभारून तासांनुसार शुल्क आकारण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक ठिकाणी सार्वजनिक वापरासाठी असलेल्या जागांचा व्यावसायिक वापर होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अशा टर्फसाठी संबंधित संस्थांनी सिडकोची परवानगी किंवा ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे का, याची काटेकोर पडताळणी करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. वाशीतील या कारवाईमुळे शहरातील इतर अशा प्रकरणांकडेही सिडकोचे लक्ष वेधले जाण्याची शक्यता आहे.

# मोगली धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

## महापौर सुजाता पाटील यांनी घेतली घटनेची दखल

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील दिघा, इलठणपाडा येथील ब्रिटिशकालीन मोगली धरण परिसरात पोहण्यासाठी ठाणे क्षेत्रात राहणारे ३ तरुण २८ मे रोजी आले होते. दुर्दैवाने, यामध्ये २० वर्षीय तरुण साहिल कैलास बनकर याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळी पोहोचून महानगरपालिका अधिकारी आणि स्थानिक नागरिकांकडून महापौर सुजाता पाटील यांनी दिघा येथे भेट देत घटनेचा आढावा घेतला.

मोगली धरण सध्या रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारीत आहे. हे धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावे, यासाठी रेल्वे विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याचे सुजाता पाटील यांनी सांगितले. मात्र या प्रक्रियेमध्ये विलंब होत असल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला असता, भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत म्हणून तिथे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तिथे तात्काळ सुरक्षा भिंत उभारणे , आवश्यक यंत्रणा आणि चोवीस तास सुरक्षा व्यवस्था तैनात असणे अत्यंत गरजेचे असल्याचे नागरिकांनी सांगितले. याविषयी तातडीने उपाययोजना केल्या जातील असे महापौरांनी आश्वासन दिले.

# उरण वाहतूक पोलिसांतर्फे सुरक्षेच्या दृष्टीने २०२६मधील प्रभावी दंडात्मक कारवाई



**उरण : प्रतिनिधी**

वाहतूक शाखेने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना विरोधात कठोर मोहीम राबवून वाहतूक २०२६ मध्ये आत्ता पर्यंत एकूण २३ हजार ७०७ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून तब्बल २ कोटी २१ लाख १६ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. उरणमध्ये वाहतुकीची शिस्त अबाधित राखण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उरण वाहतूक शाखेकडून सन २०२६ मध्ये मोठ्या प्रमाणावर प्रभावी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

पोलीस उपायुक्त वाहतूक विभाग नवी मुंबई यांच्या आदेशानुसार तसेच उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण वाहतूक शाखेने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना विरोधात कठोर मोहीम राबवून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण २३ हजार ७०७ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून तब्बल २ कोटी २१ लाख १६ हजार ६०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

तसेच मद्यपान करीत वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांविरोधातही उरण वाहतूक शाखा यांनी कठोर पावले उचलीत १०८ वाहन चालकांविरुद्ध कारवाई करण्यात आल्याची माहीती वाहतूक पोलिसांनी दिली आहे.

# श्री स्वामी समर्थ मठाचा वर्धापन दिन


**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील आनंद नगर श्री स्वामी समर्थ मठ येथेस्वामी समर्थ श्री सेवा संघ यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ वर्धापन दिन शनिवार (दि. ६) जून रोजी साजरा करण्यात येणार आहे .

या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेआहे .सकाळी ८ वाजता भूपाळी आरती ,८.१५ वाजता श्रीस्वामी समर्थ महाराजांचा अभिषेक ,सकाळी ९ ते दुपारी१२ वाजता श्री स्वामी सारामृत ,सकाळी १० वाजतानैवेद्य आरती ,सकाळी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद,दुपारी ३.३० ते ६ वाजेपर्यंत पालखी सोहळा ,सायंकाळी६.३० वाजता नैवेद्य आरती ,सायंकाळी ७ वाजता भजन वकार्यक्रमाची सांगता ,असे विविध कार्यक्रम होणार आहेतअशी माहिती श्री स्वामी समर्थ सेवा संघ कार्यकारिणी मंडळ यांनी दिली आहे.

# मच्छीमार होड्या, मचवे किनाऱ्याला लागण्यास सुरुवात

## १ जूनपासून समुद्रात मासेमारीला बंदी



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्याला खाडी किनारी भाग लाभला असून मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांच्या होड्या, मचवे किनाऱ्याला लागण्यास सुरुवात झाली आहे.

१ जूनपासून मासेमारीवर बंदी लागू होणार असून कोळीबांधव आपल्या होड्या, मचवे किनाऱ्याला लावत आहेत. त्याचबरोबर अनेक कोळी बांधव आपल्या होड्यांची डागडुजी व दुरूस्ती करून घेत आहेत व मासेमारीसाठी लागणारी जाळे विणत आहेत. काही जाळे दुरूस्तीची कामे करत आहेत.

यावर्षीच्या वातावरणीय बदलांमुळे मासेमारीवर परिणाम झाला होता.त्यावेळी मासे कमी मिळत होते. परिणामी अर्थिक नुकसान होत होता. आता होड्या किनाऱ्याला लावल्या जात आहेत. शासन निर्णयानुसार १ जून ते ३१ जुलै या कालावधीत पावसाळी मासेमारीवर अधिकृत बंदी जाहीर केली आहे. या दोन महिन्यांच्या कालावधीत समुद्रातील माशांच्या प्रजोत्पादन काळ असतो. बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेला मोठा वाव मिळून समुद्रातील मासळीचा साठा वाढण्यास मदत होते.

तालुक्यात वाशीहवेली, रहाटाड, मजगाव, रोवळा, मांदाड, कुडे, गिरणे या किनारी भागात मासेमारी केली जाते.

# मध्य रेल्वेकडून अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या ; प्रवाशांना दिलासा

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे उन्हाळ्याच्या हंगामात प्रवाशांच्या मागणीनुसार छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई आणि मडगाव दरम्यान २ अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सोलापूर १ एकेरी विशेष गाडी चालवणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मडगाव छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष- (२ सेवा) गाडी क्रमांक ०११७३ विशेष गाडी दिनांक ३०.०५.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२५ वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी १५.१५ वाजता पोहोचेल. (१ सेवा) गाडी क्रमांक ०११७४ विशेष दिनांक ३०.०५.२०२६ रोजी मडगाव येथून १६.०० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०३.४५ वाजता पोहोचेल. (१ सेवा) या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, अरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडावली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- सोलापूर एकेरी विशेष (१ सेवा) गाडी क्रमांक ०११७५ एकेरी विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून दिनांक ३१.०५.२०२६ रोजी दुपारी १४.३० वाजता सुटेल आणि सोलापूर येथे त्याच दिवशी रात्री २३.४५ वाजता पोहोचेल.

या गाडील दादर, ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड आणि कुर्डुवाडी हे थांबे देण्यात आले आहेत. विशेष गाडी क्रमांकः ०११७३ आणि ०११७५ साठी आरक्षण दिनांक २९.०५.२०२६ रोजी सुरू होईल सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि http://www.irctc.co.in या संकेतस्थळावर. सर्वसाधारण शुल्कासह अनारक्षित डब्यांसाठी आरक्षण यूटीएस (UTS) प्रणालीद्वारे करता येईल. प्रवासी तिकिट बुकिंगसाठी रेलवन ॲप देखील डाउनलोड करू शकतात.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा. असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# माथेरान-नेरळ घाट रस्त्यावर जड-अवजड वाहनांना बंदी

## सोमवार ते गुरुवारच रस्ता दुरुस्तीची कामे; जीवनावश्यक सेवांना सूट

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान-नेरळ-कळंब रस्ता (एसएच-१०९) किमी ०+०० ते किमी २०+४०० पर्यंतच्या रस्ता सुधारणा कामासाठी तात्पुरती वाहतूक वळविणे शक्य नसल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी सदर मार्गावर जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत.

महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळामार्फत (MSIDC) माथेरान-नेरळ-कळंब रस्त्याच्या सुधारणेची कामे हाती घेण्यात आली आहेत. प्रकल्पांतर्गत माथेरान ते नेरळ दरम्यानचा घाटमाथ्यावरील रस्ता अरुंद, तीव्र उताराचा व धोकादायक वळणांचा असल्याने बांधकामाच्या कालावधीत वाहतूक सुरळीत ठेवणे कठीण होणार असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते.

पोलीस प्रशासनानेही माथेरान हे प्रमुख पर्यटनस्थळ असल्याने शनिवार, रविवार तसेच सलग सुट्ट्यांच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे येत असल्याचे नमूद केले आहे. माथेरानमध्ये प्रवेशासाठी नेरळ-माथेरान घाट रस्ता हा एकमेव मार्ग असून, दस्तुरी नाका येथील पार्किंग क्षमता मर्यादित असल्यामुळे अनेक वाहनचालकांना घाट रस्त्यावरच वाहने उभी करावी लागतात. त्यामुळे वाहतूक कोंडी व अपघाताचा धोका वाढत असल्याचे अभिप्रायात स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी रस्ता दुरुस्तीची कामे शनिवार, रविवार तसेच सलग सुट्ट्यांच्या दिवशी न करता केवळ सोमवार ते गुरुवार या चार दिवसांत करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच काम सुरू असताना सदर मार्गावर सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घालण्यात आली आहे.

दरम्यान, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी आदी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना या बंदीतून सूट देण्यात आली आहे.

# पेण आमटेम येथे घरफोडी; पावणेपाच लाखांचा ऐवज लंपास

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील आमटेम पाचआंबेवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून तब्बल ४ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. काही दिवसांपूर्वी सालिदे बुर्डी येथे झालेल्या घरफोडीच्या घटनेनंतर पुन्हा चोरीची घटना घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी वासंती विश्वनाथ तांबोळी या वाढदिवसासाठी २७ मे रोजी पनवेल येथे गेल्या असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे लोखंडी कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटाचे ड्रॉवर फोडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेण्यात आली. चोरीमध्ये दोन तोळ्यांची सोन्याची चैन, एक तोळ्याचा सोन्याचा हार, सोन्याची नथ आणि एक लाख रुपयांची रोख रक्कम असा एकूण ४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे.

ही घटना २७ मे रोजी रात्री ११ ते २८ मे रोजी पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान घडल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक चव्हाण पुढील तपास करत आहेत. वारंवार घडणाऱ्या घरफोडीच्या घटनांमुळे परिसरातील नागरिकांनी पोलिसांकडे गस्त वाढवण्याची मागणी केली आहे.

# युवा नेते आकाश धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरातील उभरते सामाजिक नेतृत्व, शिवसेनेचे युवा नेते आकाश धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी रक्तदान शिबिर, वृक्षारोपण यांसह विविध सामाजिक उपक्रमांचे रोहा शिवसेनेच्या वतीने आयोजन करण्यात आले.

समाजाप्रती बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात अनेक युवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. यावेळी वृक्षारोपण व अन्नदान करण्यात आले.

या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, रोहा तालुका सकल मराठा समाज अध्यक्ष प्रदीप देशमुख, उपतालुका प्रमुख चंद्रकांत लोखंडे, शिवसेना नेते अशोक धोत्रे, युवती सेना जिल्हाप्रमुख सायली सदावर्ते, रोहा येथील शिवसेना कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते.

# कर्जतमध्ये कुत्र्यांचे रेबिज लसीकरण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील भटक्या कुत्र्यांना रेबिज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले कर्जत शहरातील बाजारपेठ परिसरात दोन दिवसांपूर्वी एका पिसाळलेल्या कुत्र्याने काही कुत्र्यांना तसेच नागरिकांना चावा घेतल्याची घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संशयित १० कुत्र्यांना रेबिज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले.

हे लसीकरण प्राणीमित्रांच्या सहकार्याने डॉ. मनीषा गुटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



# पाली बसस्थानक नूतनीकरणासाठी परिवहनमंत्र्यांना निवेदन




**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील बसस्थानकाच्या नूतनीकरणाचे काम 4 ते 5 वर्षांपासून ठप्प आहे. त्यामुळे या बसस्थानकाची निवारा शेड आणि नवीन सुसज्ज बसस्थानक बांधकामाच्या संदर्भात मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे यांनी राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन मागणीचे निवेदन दिले.

परिवहनमंत्री सरनाईक यांनी प्रचंड गर्दीत आवर्जून वेळ काढत या निवेदाची दखल घेतली. या गंभीर समस्येवर त्वरित तोडगा काढण्यासाठी मंत्री सरनाईक यांनी निवेदनावर शेरा मारून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना तात्काळ चौकशी व पुढील कारवाईचे आदेश दिले आहेत. यामुळे पाली-सुधागडमधील प्रवाशांना लवकरच हक्काचे आणि सुसज्ज बसस्थानक मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

# रायगडातील किल्ले : पर्यटनासोबत संवर्धनाची हाक

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेसाठी निर्माण केलेले स्वराज्य. या स्वराज्याची राजधानी म्हणजे दुर्गदुर्गेश्वर रायगड. रायगड जिल्हा हा केवळ रायगड किल्ल्यापुरता मर्यादित नाही. कुलाबा, खांदेरी-उंदेरी, सुधागड, सरसगड, माणिकगड, अवचितगड, कोरलई, रेवदंडा, सागरगड, विशाळगड, घोसाळगड असे ३० हून अधिक छोटे मोठे किल्ले या जिल्ह्याच्या मातीत इतिहास सांगत उभे आहेत. सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेले हे किल्ले म्हणजे महाराष्ट्राची शान आहेत. पण आज यातील अनेक किल्ल्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पर्यटकांची वाढती संख्या, नैसर्गिक आपत्ती, झाडाझुडपांचा विळखा आणि देखभालीचा अभाव यामुळे तटबंदी ढासळत आहेत.



बुरुजांना तडे गेले आहेत. पाण्याची टाकी, धान्याची कोठारे बुजली आहेत. काही ठिकाणी तर गडावर जाण्यासाठी योग्य वाटही नाही. रायगड किल्ल्यावर रोप-वे झाला, काही प्रमाणात संवर्धनाचे काम झाले. पण सुधागड, सरसगड, माणिकगडसारख्या किल्ल्यांकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. पर्यटन विभागाच्या नकाशावरही अनेक किल्ले नाहीत. त्यामुळे पर्यटक फक्त रायगड, कुलाबा पाहून परत जातात. किल्ल्यांचे संवर्धन ही फक्त पुरातत्व विभागाची जबाबदारी नाही. ती प्रत्येक रायगडकराची जबाबदारी आहे. कारण हे किल्ले म्हणजे आपला वारसा, आपली अस्मिता आहे. यासाठी 'एक गाव, एक किल्ला' ही संकल्पना राबवणे गरजेचे आहे. ज्या गावाच्या हद्दीत जो किल्ला असेल, त्या गावाने तो दत्तक घ्यावा. ग्रामपंचायत, शाळा, तरुण मंडळे यांनी एकत्र येऊन महिन्यातून एकदा गडावर स्वच्छता मोहीम राबवावी. झाडेझुडपे काढावीत, पाण्याची टाकी साफ करावीत, वाटांवर दिशादर्शक फलक लावावेत. यासाठी शासनाने निधी आणि तांत्रिक मार्गदर्शन द्यावे. स्थानिक तरुणांना 'दुर्गमित्र' किंवा 'सह्याद्री मित्र' म्हणून प्रशिक्षित करावे. त्यांना गडाचा इतिहास, भूगोल, वास्तुकला याची माहिती द्यावी.

हे तरुण गाईड म्हणून काम करू शकतील. पर्यटकांना माहिती देतील, त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेतील, प्लास्टिक कचरा होणार नाही याची दक्षता घेतील. यातून त्यांना रोजगारही मिळेल आणि गडांचे संवर्धनही होईल. पावसाळ्यात गडावर जाण्यास बंदी असते, पण उर्वरित आठ महिने नियोजनबद्ध पर्यटन वाढवता येईल. प्रत्येक किल्ल्याच्या पायथ्याशी मूलभूत सुविधा उभाराव्यात. स्वच्छ स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय, माहिती केंद्र, स्थानिक पदार्थांची छोटे हॉटेल यामुळे पर्यटकांचा मुक्काम वाढेल. रायगड किल्ल्यावर रात्रीच्या मुक्कामाची सोय केल्यास पर्यटक दोन दिवस थांबतील. यामुळे स्थानिकांना व्यवसाय मिळेल. 'फोर्ट सर्किट' तयार करावे. उदाहरणार्थ, अलिबाग-कुलाबा-रेवदंडा-कोरलई असा एक दिवसाचा सर्किट, किंवा पाली-सुधागड-सरसगड असा ट्रेक सर्किट. याचे नकाशे, माहिती पुस्तिका पर्यटन विभागाने प्रकाशित कराव्यात. शाळा, महाविद्यालयांच्या सहली गडांवर नेल्या पाहिजेत.

इतिहासाच्या पुस्तकात वाचलेला शिवकाल मुलांना प्रत्यक्ष अनुभवता आला पाहिजे. यातूनच पुढची पिढी घडेल. गडकोट मोहिमांचे आयोजन करावे. 'गड संवर्धन' हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. सोशल मीडियाचा वापर करून आपल्या किल्ल्यांचे मार्केटिंग करावे. ड्रोनद्वारे काढलेले व्हिडिओ, माहितीपट युट्यूबवर प्रसिद्ध करावेत. 'अनएक्सप्लोर्ड फोर्ट्स ऑफ रायगड' अशी मोहीम राबवावी. परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी इंग्रजी, फ्रेंच, जर्मन भाषेत माहिती उपलब्ध करावी. किल्ले म्हणजे फक्त दगड, माती, चुना नाही. तो शिवरायांच्या शौर्याचा, त्यागाचा, दूरदृष्टीचा साक्षीदार आहे. तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी यांच्या पराक्रमाच्या आठवणी इथल्या मातीत आहेत. हा वारसा जपणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. फक्त शासनावर अवलंबून न राहता, लोकसहभागातून गडकोट संवर्धनाची चळवळ उभी राहिली तरच पुढच्या शेकडो वर्षे हे किल्ले दिमाखात उभे राहतील. रायगड जगला तर महाराष्ट्र जगेल.

(साभार : इंटरनेट)

# जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त नेरळमध्ये शिबिरास प्रतिसाद

**नेरळ : प्रतिनिधी**

जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त कर्जत मेडिकल असोसिएशन, सद्भाव फाउंडेशन, लायन्स अँड ट्रब्रो तसेच श्री समर्थ सेवा मंडळ, नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळ येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले असून महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत मोफत आरोग्य सेवेचा लाभ घेतला.



कै. बापुराव धारप सभागृह, नेरळ येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये जनरल तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, शुगर तपासणी तसेच नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी आवश्यक औषधेही मोफत देण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी अशा प्रकारचे आरोग्य शिबिर अत्यंत लाभदायक ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. दरम्यान, नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांनी शिबिराला भेट देत आयोजक व डॉक्टरांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. "समाजाच्या आरोग्यासाठी डॉक्टरांनी राबविलेला हा उपक्रम प्रेरणादायी असून अशा सेवाभावी कार्यातून नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होत आहे," अशा शब्दांत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी कर्जत मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत गांगल यांनी माहिती देताना सांगितले की, "महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी वेळोवेळी आरोग्य तपासणी करून स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. अशा शिबिरांच्या माध्यमातून संभाव्य मोठे आजार किंवा धोके वेळेत ओळखता येतात आणि त्यावर उपचार करणे सोपे होते."या शिबिरासाठी संघटनेचे पदाधिकारी व डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिकांनीही उपस्थिती लावत या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# 'रिलायन्स'मधील कामगार संघटनेला आमदार महेंद्र दळवींचा पाठिंबा

**नागोठणे : प्रतिनिधी**

"रिलायन्समध्ये दीपक रानवडे यांच्या नेतृत्वाखालील कामगार संघटनेला माझा पूर्ण पाठिंबा आहे. स्थानिकांना अधिकाधिक रोजगार मिळावा हीच आमची भूमिका राहील," असे स्पष्ट मत आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केले. रिलायन्सच्या नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजनमधील भारतीय श्रमिक शक्ती संघाच्या नवीन कार्यकारिणीच्या घोषणावेळी ते बोलत होते.



राजमाला (ता. अलिबाग) येथे आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यालयात भारतीय श्रमिक शक्ती संघाचे केंद्रीय अध्यक्ष ॲड. नितीन शिवकर, केंद्रीय कार्याध्यक्ष दीपक रानवडे व केंद्रीय सरचिटणीस जिम्मी डे यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. २७) नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजनमध्ये १ जून २०२६ पासून नवीन कार्यकारिणी कार्यरत होणार असून, अध्यक्षपदी किशोर शिर्के यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्ष पंडित तुपकर, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज पेढावी व दिनेश शिर्के, उपाध्यक्ष अजित घरत, विनोद गोरे व राजकुमार राजभर, सरचिटणीस चंद्रकांत अडसुळे, सचिव यशवंत डाकी व प्रकाश तेरडे, सहसचिव संजय शिर्के, विठोबा कुथे, नरेश म्हात्रे, इस्माईल पिट्टू, खजिनदार असलम चोगले तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून अनिल जांबेकर, दीपक पाटील, राजेश जवके, सिताराम वारगे, सुभाष म्हात्रे व गणेश जाधव यांचा समावेश करण्यात आला आहे. सल्लागार म्हणून सुभाष खराडे व मारुती दांडेकर, तर कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. महेश पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कार्याध्यक्ष दीपक रानवडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, रिलायन्समधील सुमारे ७० टक्के कामगार भारतीय श्रमिक शक्ती संघाशी जोडलेले आहेत. संघटना हे एक कुटुंब असून नवीन पदाधिकाऱ्यांनी टीमवर्कच्या माध्यमातून काम करत कामगारांच्या प्रश्नांना न्याय द्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

दरम्यान, ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणारे कर्मचारी संजय काकडे, सुधीर पारंगे, अजीम बेणसेकर, सुभाष ताडकर व महादू लाडगे यांचा सत्कार आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाला शिवसेना रायगड जिल्हा महिला संपर्क प्रमुख संजीवनी नाईक, नगरसेविका सुजाता डाकी, नगरसेवक भूषण कडू, अशोक भोय, प्रकाश मोरे, भारती सिंगासने, मोहन भोय, विनोद गोरे यांच्यासह भारतीय श्रमिक शक्ती संघाच्या रिलायन्स युनिटमधील कर्मचारी उपस्थित होते.

# भारतीय महिला संघाचा इंग्लंडवर विजय

## नंदिनी चमकली

**लंडन : वृत्तसंस्था**

येत्या काही दिवसांत आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेचा थरार सुरू होणार आहे. ही स्पर्धा इंग्लंडमध्ये खेळवली जाणार आहे. स्पर्धा सुरू होण्याआधी भारत आणि इंग्लंड महिला संघांमध्ये तीन टी-२० सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना गुरुवारी पार पडला. भारताने हा सामना ३८ धावांनी आपल्या नावावर केला.

या सामन्यात इंग्लंड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून जेमिमा रॉड्रिग्जने ६९ धावांची खेळी केली. यस्तिका भाटियाने ५४ धावा केल्या. दीप्ती शर्माने शेवटी २२ धावा केल्या. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने सात बाद १८८ धावा केल्या होत्या.

या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या इंग्लंडला १५० धावांपर्यंत मजल मारता आली. हा सामना भारतीय




संघाने ३८ धावांनी जिंकून मालिकेत १-०ने आघाडी घेतली आहे.

या सामन्यात भारतीय संघाकडून नंदिनी शर्माला पदार्पण करण्याची संधी देण्यात आली होती. तिने पदार्पणाच्या सामन्यात दमदार गोलंदाजी केली आणि भारतीय संघाला विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. यादरम्यान तिने १६ वर्षांपूर्वीचा मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

इंग्लंडमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळालेल्या नंदिनी शर्माने या संधीचा पुरेपूर फायदा घेत ३४ धावा देत इंग्लंडच्या तीन फलंदाजांना माघारी धाडले. ही कुठल्याही भारतीय गोलंदाजाने हा सामन्यात केलेली सर्वोत्तम कामगिरी ठरली.

नंदिनी शर्मा ही मध्यमगती वेगवान गोलंदाज आहे. या सामन्यात तीन गडी बाद करताच तिच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. नंदिनी ही टी-२० पदार्पणात तीन गडी बाद करणारी दुसरीच भारतीय वेगवान गोलंदाज ठरली आहे. याआधी हा रेकॉर्ड सोनिया दबीरच्या नावे होता. सोनियानेदेखील २०१०मध्ये इंग्लंडविरुद्ध टी-२० पदार्पण केले होते. या सामन्यात तिने २३ धावा खर्च करून तीन विकेट्स घेतल्या होत्या. आता नंदिनी शर्मा असा कारनामा करणारी दुसरी भारतीय वेगवान गोलंदाज ठरली आहे, तर सातवी भारतीय गोलंदाज ठरली आहे, जिने पदार्पणात तीन गडी बाद केले आहेत.

## आयपीएलमध्ये आता स्मार्ट सनग्लासेसवर बंदी!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल स्पर्धा अखेरच्या टप्प्यात आली असताना भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आणखी एक महत्त्वाचा नियम लागू केला आहे. यावेळी खेळाडू आणि सामना अधिकाऱ्यांसाठी स्मार्ट सनग्लासेस वापरण्यावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. आयपीएलच्या सुरक्षेला आणि सामन्यांच्या निष्पक्षतेला कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी हा निर्णय घेतल्याचे बोर्डाने स्पष्ट केले आहे.

साधे गॉगल्स आणि स्मार्ट सनग्लासेस यात मोठा फरक आहे. स्मार्ट सनग्लासेस हे केवळ डोळ्यांचे संरक्षण करणारे गॉगल्स नसून त्यामध्ये अनेक आधुनिक फीचर्स असतात. काही स्मार्ट गॉगल्समध्ये लाइव्ह स्ट्रीमिंग, व्हिडीओ कॉलिंग, फोटो-व्हिडीओ रेकॉर्डिंग, मेसेज पाठवणे आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी अशा सुविधा




उपलब्ध असतात.

बीसीसआयच्या मते, अशा डिव्हाइसचा गैरवापर झाल्यास सामना सुरू असताना संवेदनशील माहिती बाहेर जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः स्पॉट फिक्सिंग, मॅच फिक्सिंगसारख्या बाबींना रोखण्यासाठी बोर्डाने हा निर्णय घेतला आहे.

बीसीसीआयने स्मार्ट सनग्लासेसना ऑडीओ-व्हिडीओ रेकॉर्डिंग डिव्हाइस आणि कम्युनिकेशन डिव्हाइस या दोन्ही श्रेणींमध्ये ठेवले आहे. त्यामुळे नव्या नियमानुसार आयपीएलमधील खेळाडू, सपोर्ट स्टाफ आणि अधिकाऱ्यांना प्लेइंग एरियामध्ये प्रवेश करण्यापूर्वी आपले मोबाईल फोन, स्मार्ट वॉच आणि स्मार्ट सनग्लासेस सुरक्षा अधिकाऱ्यांकडे जमा करावे लागतील.

याआधी मोबाईल आणि स्मार्ट वॉचवर निर्बंध होतेच, मात्र आता स्मार्ट सनग्लासेसचाही त्यात समावेश करण्यात आला आहे. बीसीसीआयच्या ॲण्टी-करप्शन युनिटने सर्व फ्रँचायझींना या संदर्भात निर्देश जारी केले आहेत.

विशेष म्हणजे नियम मोडणाऱ्यांवर आयपीएलच्या आचारसंहितेनुसार कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही बीसीसीआयकडून देण्यात आला आहे.

## बुद्धिबळ स्पर्धेत जान्हवी सोनेजीचा रेयांशविरुद्ध विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

जान्हवी सोनेजी (१७९२) हिने एकेरी आघाडी मिळवलेल्या रेयांश व्यंकट (१९०६) याचा पराभव करत अखिल भारतीय बुद्धिबळ मुंबई मास्टर्सच्या चौथ्या सत्रात आघाडी मिळवली. यासह तिने अंतिम फेरीपूर्वी विजेतपदाच्या शर्यतीत मोठी रंगत निर्माण केली.

मुंबई चेस सेंटरच्या वतीने पेडर रोड येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत काळ्या मोहऱ्यांनी खेळताना जान्हवीने अत्यंत संयमी व परिपक्व खेळ केला. किचकट आणि गुंतागुंतीच्या चाली रचत तिने रेयांशला गोंधळवून ठेवत



त्याने केलेल्या चुकांचा फायदा घेत विजय मिळवला. हा रेयांशचा या स्पर्धेतील पहिला पराभव ठरला.

एजीएम राजवीर पिंकेश नहार (१८०१) याने अव्वल मानांकित श्रेयांश सोमय्या (१९७३)वर विजय मिळवत पुनरागमन केले तसेच मयुरेश पारकर (१७८१) याने शार्दूल कदम आदित्य (१९१७) याला पराभूत केले.

## 'आरडीसीए'च्या स्पर्धेत कामोठ्याचा रोशन क्रिकेट अकॅडमी संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २३ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रोशन क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने अंतिम विजयी संघ होण्याचा मान मिळवला. पेण संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेतील मालिकावीर म्हणून पेण स्पोर्ट्स संघाचा अष्टपैलू खेळाडू श्रवण वडे याला गौरविण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज म्हणून करण बोराडे याची निवड करण्यात आली. उत्कृष्ट गोलंदाजीचे पारितोषिक ओम कांबळे याला, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाचे



पारितोषिक यश झावरेला देण्यात आले. आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सदस्य अरुण शिंदे, मनोहर अहिर, प्रफुल्ल टेमघरे, बाळकृष्ण पाटील, दिनेश सावंत यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

अंतिम सामन्यात रोशन क्रिकेट अकॅडमी संघाने दोन धावांनी विजय मिळवून विजेतेपद पटकावले. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना या संघाने ३८.४ षटकांमध्ये सर्व गडी गमावत २०४ धावा केल्या होत्या. त्यामध्ये विघ्नेश देशमुख याने सर्वाधिक ५० धावा काढल्या, तर आर्यन पालांडे ३४, रॉबिन वेल याने २७ धावा काढून संघाला योगदान दिले. पेण स्पोर्ट्सकडून हरदेव सिंह याने चार, तर श्रवण वडे याने दोन फलंदाज बाद केले.

प्रत्युतरात पेण स्पोर्ट्स संघाने शेवटपर्यंत कडवी झुंज दिली. नील कोळी याने ५६, हर्ष म्हात्रे ३३, निखिल भोईरने ३२ धावांची खेळी केली. जिंकण्यासाठी शेवटच्या तीन धावा हव्या असताना संघाचे सर्व गडी बाद झाले. रोशन क्रिकेट अकॅडमीकडून कर्णधार यश झावरे याने पाच, पार्थ केसकर तीन व रॉबिन वेल याने दोन फलंदाज बाद करून संघाला विजय मिळवून दिला.

## टी-२०मध्ये गेल नाही, तर साहिल चौहानच्या नावे सर्वात वेगवान शतक!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या एलिमिनेटर सामन्यात वैभव सूर्यवंशी इतिहास रचण्यापासून फक्त एका शॉटने दूर राहिला. राजस्थान रॉयल्सच्या या १५ वर्षीय फलंदाजाने सनराइजर्स हैदराबादच्या खेळाडूंविरोधात वादळी फलंदाजी केली, जी कायम फॅन्सच्या आठवणीत राहील. २७ मे रोजी हैदराबादविरुद्धच्या सामन्यात वैभवने केवळ २९ चेंडूमध्ये ९७ धावा ठोकल्या. त्याच्या या खेळीत १२ षटकार आणि पाच चौकारांचा समावेश होता. मैदानावर वादळासारखी फलंदाजी करणाऱ्या वैभवसमोर सनराइजर्स हैदराबादच्या गोलंदाजांचा धुव्वा उडला.

सर्वात खास म्हणजे वैभव आयपीएलच्या इतिहासात सर्वात वेगवान शतक बनवण्याच्या रेकॉर्डच्या अगदी जवळ होता. तो २८ चेंडूत ९८ धावांवर खेळत होता आणि त्याला एका मोठ्या शॉटची गरज होती. संपूर्ण मैदानातील प्रेक्षक त्याच्या इतिहास रचण्याची वाट पाहत होते, परंतु हैदराबादचा गोलंदाज प्रफुल हिंगे याने त्याची विकेट काढली आणि वैभवच्या नावावर नवा रेकॉर्ड बनता बनता राहिला. जर वैभवने २९ चेंडूमध्ये शतक पूर्ण केले असते, तर तो टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वात वेगवान शतक करणाऱ्यांच्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आला असता. इतकेच नाही तर ख्रिस गेलचा आयपीएलमधील सर्वात




वेगवान शतक बनवण्याचा रेकॉर्डही वैभवने तोडला असता.

टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वात वेगवान शतक बनवण्याचा रेकॉर्ड एस्टोनियाचा फलंदाज साहिल चौहान याच्या नावावर आहे. २०२४ साली सायप्रसविरोधात खेळताना साहिलने टी-२० आंतरराष्ट्रीय खेळात अवघ्या २७ चेंडूत शतक ठोकले होते.

टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वात वेगवान शतक बनवणाऱ्या यादीत दुसऱ्या स्थानावर दोन भारतीय फलंदाज आहेत. उर्विल पटेल याने २०२४ साली गुजरातकडून खेळताना त्रिपुराविरोधात २८ चेंडूत शतक केले होते, तर अभिषेक शर्मा यानेही पंजाबकडून खेळताना मेघालयविरोधात २८ चेंडूत शतक केले होते. तुर्कीचा फलंदाज मोहम्मद फहदने २०२५ साली बुल्गारियाविरोधात २९ चेंडूत शतक बनवले होते. वैभव सूर्यवंशीने २९ चेंडूत शतक पूर्ण केले असते, तर तोदेखील या यादीत समाविष्ट झाला असता.

दरम्यान, आयपीएलचा इतिहास पाहिला तर सर्वात वेगवान शतक बनवण्याचा रेकॉर्ड ख्रिस गेलच्या नावे आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी खेळताना गेलने २०१३ साली पुणे वॉरियर्सविरोधात अवघ्या ३० चेंडूत शतक बनवले होते. वैभव सूर्यवंशी यात दुसऱ्या नंबरवर आहे. वैभवने २०२५ साली गुजरातविरोधात खेळताना ३५ चेंडूत शतक बनवले होते. त्याच्या रुपाने भारतीय क्रिकेटला नवा सुपरस्टार मिळाला आहे. तो नवनवीन रेकॉर्ड ब्रेक करत आहे.

## मुंबई इंडियन्सला हार्दिक पांड्या करणार अलविदा?

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६च्या हंगामात मुंबई इंडियन्सला ग्रुप स्टेजमधील त्यांच्या १४ पैकी फक्त चार सामन्यातच विजय मिळवता आला आहे. यंदाच्या हंगामात हार्दिक पांड्याच्या फॉर्म आणि कॅप्टन्सीबाबतदेखील खूप चर्चा झाली आहे. संघाकडून हार्दिकला सपोर्ट मिळत नसल्याचे अनेक जाणकारांचे निरीक्षण राहिले आहे. अशा परिस्थितीत हार्दिक पांड्या हा मुंबई इंडियन्स सोडू शकतो, असे चित्र निर्माण झाले आहे.

हार्दिक पांड्याच नाही तर मुंबई इंडियन्सचे संघ व्यवस्थापनदेखील हार्दिकला सोडून दुसरा विचार करण्याची शक्यता आहे. २०२४मध्ये मुंबईने हार्दिकला गुजरात टायटन्सकडून ट्रेड करत थेट कर्णधार केले होते, मात्र हा निर्णय यशस्वी ठरला नाही.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबई इंडियन्सच्या मॅनेजमेंटमध्ये मोठा खल सुरू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदावर तोच विराजमान होईल ज्याच्या डोक्यावर रोहित शर्माचा हात असेल. मुंबई इंडियन्सच्या मॅनेजमेंटने रोहितला काढून



### रोहितचा शब्द चालणार

सूत्रांनी सांगितले की, मुंबई इंडियन्सचा पुढचा कर्णधार तोच असेल त्याला रोहित शर्माचा आशीर्वाद प्राप्त झाला असेल. मुंबई इंडियन्स संघाला त्यांची चूक समजली आहे, मात्र मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदाबाबत बोलायचे झाले तर ते पुन्हा रोहितकडे जाण्याची शक्यता नाही, हे मात्र निश्चित आहे.

हार्दिककडे सूत्रे सोपवण्याच्या घटनेवरून धडा घेतला आहे. अशाच प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आता संघ व्यवस्थापन काळजी घेत आहे. मुंबई इंडियन्स संघात रोहित हे सर्वात मोठे नाव आहे. तो आता संघाचा पुढचा कर्णधार निवडण्यामध्ये मोठी भूमिका निभावणार आहे.

## कर्जतच्या नहुष बोराडेची निवड

### रोहित शर्माला घडविणाऱ्या दिनेश लाड यांच्या अकादमीत प्रशिक्षणाची संधी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील एकसळ गावातील क्रिकेटवेड्या मंगेश बोराडे यांचा पुत्र नहुष याला भारताचा हिटमॅन रोहित शर्मा याला घडविणाऱ्या दिनेश लाड अकादमीत प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे.

लहान वयातच नहुषने आपल्या क्रिकेट कौशल्याची छाप पाडली असून त्याच्या जिद्द, मेहनत आणि खेळातील आवडीमुळे त्याची निवड फाउंडेशनतर्फे करण्यात आली आहे. फाउंडेशनतर्फे सहा वर्षीय नहुषच्या शैक्षणिक खर्चासोबतच व्यावसायिक क्रिकेट प्रशिक्षणासाठीही आवश्यक मदत केली जाणार आहे.

ग्रामीण भागातील अनेक गुणवंत खेळाडूंना आर्थिक अडचणींमुळे योग्य संधी मिळत नाहीत, पण भारतीय माजी कर्णधार रोहित शर्मा आणि



शार्दुल ठाकूरसारखे क्रिकेटपटू घडवणारे प्रशिक्षक दिनेश लाड यांच्या अकादमीने वायएससीसी अकॅडमी येथे प्रशिक्षण घेणाऱ्या नहुषला मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे.

याबाबत नहुष बोराडे याने, माझ्या क्रिकेट प्रवासासाठी मिळालेला हा मोठा आधार असून मी अधिक मेहनत घेऊन चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करेन, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## वैभव सूर्यवंशीची तुलना शाहिद आफ्रिदीशी

### मोहम्मद युसूफच्या 'त्या' पोस्टवर नेटकरी संतापले!

**कराची : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६मध्ये आपल्या फटकेबाजीने क्रिकेट विश्वाला चकित करणाऱ्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीची सध्या जगभर चर्चा आहे. राजस्थान रॉयल्सकडून खेळताना वैभवने केलेल्या वादळी खेळीनंतर अनेक दिग्गजांनी त्याची तुलना सचिन तेंडुलकर आणि डॉन ब्रॅडमन यांच्याशी केली, मात्र पाकिस्तानचा माजी फलंदाज मोहम्मद युसूफ याने वैभवची तुलना थेट पाकिस्तानच्याच एका वादग्रस्त माजी खेळाडूशी केली आहे. युसूफच्या या तुलनेमुळे सोशल मीडियावर भारतीय क्रिकेट चाहते चांगलेच भडकले असून नेटकऱ्यांनी याला वैभवचा मोठा अपमान म्हटले आहे.

आयपीएल २०२६च्या एलिमिनेटर सामन्यात राजस्थान रॉयल्सच्या वैभव सूर्यवंशीने अवघ्या २९ चेंडूत ९७ धावांची






ऐतिहासिक खेळी केली. त्याचे आयपीएलमधील सर्वात वेगवान शतक अवघ्या तीन धावांनी हुकले. वैभवच्या या स्फोटक खेळीनंतर मोहम्मद युसूफने एक्स (पूर्वीचे ट्विटर)वर एक पोस्ट शेअर केली.

युसूफने आपल्या पोस्टमध्ये लिहिले, "१५ वर्षांचा नवोदित स्टार वैभव सूर्यवंशी मला शाहिद आफ्रिदीची आठवण करून देतो. तरुण, निर्भय, स्फोटक आणि ऊर्जेने भरलेला! क्रिकेटचे भविष्य आपल्यासमोर आहे."

शाहिद आफ्रिदीने १९९६मध्ये आपल्या पहिल्याच एकदिवसीय डावात अवघ्या ३७ चेंडूत शतक ठोकले होते. हे शतक पुढील १८ वर्षे जागतिक क्रिकेटमधील सर्वात वेगवान शतक ठरले होते. आफ्रिदीनेही वयाच्या सुरुवातीच्या काळातच अशी आक्रमक सुरुवात केली होती, हा संदर्भ देत युसूफने ही तुलना केली, मात्र भारतीय क्रिकेट चाहत्यांना वैभवची तुलना आफ्रिदीशी झालेली अजिबात आवडलेली नाही. सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी युसूफला सुनावले आहे.

"वैभवकडे अफाट टॅलेंट आणि सातत्य आहे, त्याची तुलना आफ्रिदीसारख्या बेभरवशाच्या खेळाडूशी करणे हा त्याचा सर्वात मोठा अपमान आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया एका चाहत्याने दिली, तर दुसऱ्या एका युझरने लिहिले, "वैभवला आफ्रिदी नाही, तर आधुनिक क्रिकेटचा किंग बनायचे आहे. त्याची तुलना सचिन किंवा ब्रॅडमनशी होणे योग्य आहे, आफ्रिदीशी नाही."

बिहारच्या अवघ्या १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने चालू आयपीएल हंगामात जगातील दिग्गज गोलंदाजांची धुलाई केली आहे. सध्याच्या घडीला तो भारतीय क्रिकेटचे भविष्य मानला जात आहे, मात्र पाकिस्तानी दिग्गजाने कौतुक करताना केलेल्या या एका चुकीच्या तुलनेमुळे सध्या सोशल मीडियावर मोठा वाद पेटला आहे.

**निवासी / प्लॉटिंगसाठी जागा आवश्यक**

**प्रतिष्ठित रिअल एस्टेट डेव्हलपर (मुंबई) यांना निवासी/प्लॉटिंग/बंगला योजनेसाठी जागा हवी आहे**

जागेचा आकार: 10-100 एकर

ठिकाणे: पनवेल बाहेरील परिसर ▸ जुना मुंबई-पुणे रोड ▸ कर्जत-चौक रोड ▸ कर्जत-खोपोली रोड ▸ खोपोली-पाली रोड

कॉल/व्हॉट्सॲप: 91529 16173

ईमेल: bd@mapletreeproperty.com

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com